Chapter-4



## प्रकरण ४ थें. आत्मचरित्रांतून घडणारें समाजदर्शन.

### १ वाङ्‌मय म्हणजे समाज जीवनाचें प्रतिबिंब.

वाङ्‌मय म्हणजे समाज जीवनाचें प्रतिबिंब होय. आत्मचरित्र हाही एक मोठा विलोभनीय असा वाङ्‌मयप्रकार आहे. आणि हा वाङ्‌मय प्रकार दिवसेंदिवस अधिकाधिक लोकप्रिय होणार यांत शंका नाहीं. अशावेळीं आता पर्यंत जीं आत्मचरित्रें लिहिली गेलीं त्यांत समाज जीवनाचें चित्र कशात-हेनें उमटलें आहे तें पाहणें बोधप्रद होणार आहे. पंचाहत्तर वर्षांपूर्वी एका ब्राम्हण मुलानें इतर मुलांच्या बरोबर रानांत सूरपारंब्याचा खेळ खेळायला गेल्यावर भूक लागली म्हणून तेल्याच्या घरची भाकर खाल्ली. तेव्हांपासून त्याला त्याच्या आईवडिलांनी लोकभयास्तव घरीं घेतलें नाही. आणि शेवटी तो मुलगा त्या तेल्याच्या घरीं राहू लागला व तेली बनला. अर्थात अशा गोष्टी आता इतिहास जमा झालेल्या आहेत. जाती जातीतील भेदाभेद हळु हळू कमीकमी होत आहेत. परंतु एवढ्यानें काम भागणार नाही. सर्व हिंदु समाज एकसंध कसा होईल आणि समाजांतील सर्व थरांच्या लोकांत अंतःकरणापासून एकमेकाबद्दल आपुलकीची भावना कशी निर्माण होईल हा फार महत्त्वाचा प्रश्न आहे. आज जग झपाट्यानें पुढे पुढे जात आहे. जगांतील सर्व राष्ट्रें एकमेकांच्या आज जितकीं जवळ आलेलीं आहेत तितकीं पूर्वी कधीही आलेली नव्हती. अशावेळी हिंदुसमाजांतील जातीयविद्वेष नाहीसा करून हिंदु समाजांत समता स्थापन होऊन तो बलवान कसा

होईल आणि आपल्या स्वतंत्र भारताला तो अधिकाधिक उज्वल कसा बनवील या विषयी सर्व विचारवंतांनी खोल विचार करून मार्ग काढला पाहिजे. कारण जगाचें कल्याण करायचें तर आपला देश प्रथम विद्येत, व्यवसायात, सामाजिक सुधारणेत, आर्थिक व्यवस्थेत आणि राजकीय लोकशाही परंपरेत परिणीत झाला पाहिजे. आणि या गोष्टी जोंवर होणार नाहीत तोंवर आपण आपल्या मायभूमीचें आणि तिच्या व्दारें जगाचें कल्याण करू शकणार नाही.

## २ समाजात समता केव्हा स्थापन होईल ?

समाजातील सर्व थरातून शिक्षणाचा प्रसार जसजसा होत जाईल आणि आर्थिक समता स्थापन होऊन खालच्या थरांतील लोकांना वर येण्याचा व नावलौकिक मिळविण्याचा अवसर जसजसा अधिकाधिक प्राप्त होईल तसतशी समाजात समता स्थापन होईल. पण या साठी पुढारलेल्या जातींनी अधिकाधिक सहिष्णुता दाखविली पाहिजे. सर्वांच्या उन्नतीत माझीही उन्नति आहे हा विचार समजून उमजून आपल्या सर्वांच्या पचनी पडला आणि आपल्या प्रत्येक हालचालींतून तो व्यक्त होऊ लागला तरच आपण सर्वजण तेवढ्यासाठी मनापासून त्याग करायला तयार होऊं.

असें झालें म्हणजे आपल्या समाजात समता स्थापन व्हायला वेळ लागणार नाही. आता हें तर खरेंच की खरी समता तेव्हाच स्थापन होईल की झाडुन सारा समाज सुशिक्षित होऊन आर्थिक सुबत्ता उपभोगूं लागेल. आता तसेंही दिवस यायला वेळ लागणार नाही. परंतु आपण सर्वांनी तनमनधनाने

तेवढ्यासाठी कसोशीने आणि मोठ्या निष्ठेने प्रयत्न केले पाहिजेत.

## ३ हो मोठी दुःखाची गोष्ट आहे

आणखी एका मुद्याविषयी अगदी थोडक्यात बोलतो. तो असा की पुष्कळ अस्पृश्य बांधवांनी आता बौध्द धर्म स्वीकारला आहे आणि आणखी पुष्कळ अस्पृश्य, बौध्द धर्म स्वीकारतील असा अंदाज आहे. आता पर्यंत अस्पृश्य बांधवांना हिंदुसमाजांत न्याय मिळाला नाही. उलट त्यांच्यावर फार अन्याय झाला आहे. शैक्षणिक, धार्मिक, सामाजिक आणि राजकीय अशा सर्व तऱ्हेने पीडलेला हा एवढा मोठा समाज हिंदुसमाजाच्या दारांत हजारो वर्षे तिष्ठत बसला असतांना त्या समाजाला आम्ही घरांत घेतलें नाही ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. त्या समाजाला आपण आपलेसें करावें अशी पोटतिडिक आपल्याला कां वाटली नाही हें कळणें फारसें कठिण नाही. कारण जाती जातीमुळे मनुष्य इतका व्देष्टा बनतो की तो माणुसकीला आपोआपच पारखा होतो. हीच माणुसकी हिंदु समाजांतून नष्ट झाल्यामुळें अस्पृश्य बांधवांना आपण आपलेसें केलें नाही यांत बिलकूल शंका नाही.

## ४ सर्वांच्या सुखांत माझें सुख.

अशा वेळी विद्येचा प्रसार झाल्या बरोबर अस्पृश्य समाजांत स्वाभिमानाची ज्योत पाजळली. म्हणूनच धर्मांतर करण्याची लाट उसळली आहे. आणि हळूहळू महाराष्ट्रांत सर्व अस्पृश्य समाज बौध्द होऊन जाईल असें दिसत आहे. अशावेळी हिंदुधर्मांतील बांधवांना अशी विनंति करावीशी वाटते की

हिंदुसमाजाने बौध्द बांधवाबरोबर ममतेने, सहिष्णुतेने, आणि मोठ्या आपुलकीने वागावें. बौध्दांना येथेच राहावयाचें आहे. त्याच खेड्यांत आता बौध्द मंदीरही बांधले जाणार आहे. अशावेळी बौध्द बांधवाशीं आपण फटकून वागलों तर त्याचे फार वाईट परिणाम होतील. आपल्या धर्मभोळ्या समजुतीमुळे हजारो नव्हे लाखो लोक पूर्वी ख्रिस्चन झाले. त्याचे दुष्परिणाम हिंदुधर्मांतील लोकांना आजही भोगावे लागत आहेत नि आणखी भोगावे लागतील. म्हणूनच या बौध्द बांधवाबरोबर सहिष्णुतेने आणि बंधुभावाने वागण्यातच त्यांची आणि आपली भलाई आहे. विद्या, सुविचार आणि चांगली कृति यांच्या जोरावर कोणताही मनुष्य मोठा होऊ शकतो व त्याला सर्वतोपरी उन्नतीचीं साधनें सर्वत्र उपलब्ध होतात अशी प्रत्यक्ष वागणूक आपल्या सर्वांच्या हातून घडली पाहिजे.

समाजांतल्या सर्व थरांतील सर्व बंधुभगिनींच्या उन्नतीवर आणि सुख शांतीवर माझी उन्नति आणि माझें सुख अवलंबून आहे असा विचार समाजांतल्या एकाच्या आणि सर्वांच्या मनांत पूर्ण बिंबला तर हें अवघड आहे असें वाटत नाही. मला याबाबत आणखी बोलायचें आहे. तें मी पुढे ओघाओघांत बोलणार आहे.

आता पुढे क्रमाक्रमाने राजकीय, सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक अशी जी उल्लेखनीय माहिती मिळाली ती येथे देतो. या माहितीमुळे त्या वेळचें समाजदर्शन आपणास घडणार आहे. तें पाहिल्या शिवाय आपणास व्याख्याचा बोध घेता येणार नाही, म्हणून हें त्यावेळचें समाजदर्शन घेणें अत्यावश्यक आहे.

** ** **

= ( ५ )= राजकीय

१ बोलता बोलता रात्र निघून जाई

लोकमान्य टिळक आणि समाज सुधारक आगरकर डोंगरीच्या तुरुंगात असतांना त्यांच्या मनात कोणते विचार घोळत होते ते पाहा ... ( १ )" टिळकांचा आणि माझा नाना त-हेच्या विषयावर वाद करण्यात पुष्कळ वेळ जाई. कित्येकदा तर आम्ही रात्रीच्या रात्री बोलत घालविल्याचे मला आठवते. मी एम्.ए. करितां व टिळक एल्.एल्.बी. करिता अभ्यास करण्यासाठी कॉलेजात राहिलों असता सरकारी नोकरी न पत्करता देशसेवेंत आयुष्य घालविण्याचा ज्या दिवशी निश्चय केला त्या दिवसापासून आम्ही जे जे बोललों चाललों होतों त्याची पुन्हा पुन्हा आठवण होऊन अनेक वेळा पुनरावृत्ति होत असे. अमुक गृहस्थाला कँपमध्यें भेटायला गेलों असता परत येतांना काळोखांत वाट चुकुन बारावर दोन वाजण्याच्या सुमारास फिरता फिरता बँडावर ( बँड गार्डनवर ) कसे येऊन ठेपलों; शाळेच्या संबंधाने विष्णुशास्त्र्यांशी बोलणें लावण्यास गांवांत गेलों असता कॉलेजला परत येतांना थंडीनें कितीतरी कुडकुडलों, वचन दिलें असतां शाळा आणि छापखाना काढला त्या वेळेस कोणकोणत्या लोकांनी माघें घेतलें; असल्या फंदांत न पडणारे कोणकोण मनुष्य त्यास घेरता आले;

आपले मूळचे हेतु कोणते व ते कितपत सिद्धीस गेले आहेत; शास्त्रीबोवांच्या अकाली मृत्यूने आपल्या उद्योगास केवढा धक्का बसला, आम्ही

---

( १ ) डोंगरीच्या तुरुंगांतील १०१ दिवस - गो.ग.आगरकर पृष्ठ ११.१२.

आरंभलेलीं कामें आमच्या ह्यातींत व आमच्या पाठीमागे कित्येक वर्षे अप्रहित चाललीं तर आमच्या देशस्थितीवर त्यांचा काय परिणाम होईल; या देशावर इंग्रजांचें राज्य झाल्याने त्याचे कोण कोणत्या बाबतींत हित आणि अनहित होत आहे, लोकशिक्षण उत्तरोत्तर जारीने पसरत गेलें तर हिंदुस्थानची भावी स्थिति काय होईल; नेटीव संस्थानांची सुधारणा होण्यास काय उपाय करावे; देशभाषा युनिव्हरसिटींत आणण्याला कोणती युक्ति काढावी; शाळा आणि कॉलेज बांधण्यास पैसे कसे गोळा करावे; कोल्हापूर प्रकरणांत आपली चुकी किती आणि आपणास भोगावी लागत असलेली शिक्षा कितपत न्याय्य आहे; आपण या तऱ्हेने येथे अडकून राहिल्याने लोकांच्या मनावर काय परिणाम होईल व आपल्या शाळेचें आणि छापखान्याचें किती नुकसान होईल; आणिबाणीच्या प्रसंगीं आपणास कोणकोण मित्र उपयोगी पडले; व पुढे कोणाकोणाच्या मदतीवर आणि शब्दावर अवलंबून राहता येईल; आता प्रमाणे फिरून तुरुंगांत न येण्यासाठी कोणकोणत्या गोष्टींची खबरदारी ठेविली पाहिजे; फिरून तुरुंगात यावें लागलें तरी ज्या गोष्टी केल्याच पाहिजेत अशा गोष्टी कोणत्या; वगैरे नानाप्रकारच्या विषयावर आमचा एकेक वेळ येवढ्या जोराने वाद चाले की आसपासचे शिपाई "हळू बोला हळू बोला" असा इशारा करीत व बोलता बोलता रात्र निघून जाई."

## २ ईंग्लिश लोकांचें चातुर्य.

दादोबा पांडुरंग यांची निरीक्षण शक्ति फार मोठी होती. ते इंग्रजांबद्दल काय म्हणतात तें पाहा: -

(१) " जाव-याहून आबुवा या गांवी जातांना त्यांनी मेजर बार्थकिक साहेब यास भिल्लभिल्लिणी व रानटी लोक यांजबरोबर टिपरी खेळतांना पाहिलें. तेव्हा ते पुसू लागले " या जंगली लोकांच्या बरोबर खेळतांना मला पाहून तुला आश्चर्य वाटलें असेल नाही ? "

म्यां म्हटलें " होय थोडें वाटलें खरें. " तेव्हां तो म्हणाला " Yes we must respect the prejudices of these wild people. "

म्यां म्हटलें " म्हणूनच मी पाहतों तों या आपल्या सर्व प्रदेशांत आपल्यास, सर्व आबालवृद्ध बापाप्रमाणे मानतात.......... "

धन्य हे ईंग्लिश लोक व त्यांचें चातुर्य. ज्या लोकांचा आमचे सरदार व बडे लोक तिरस्कार करीत होते व ज्यांस मोठा त्रास देत होते त्यांचीं मनें हे या प्रमाणें आपल्या कडेस वळवू लागले आहेत. असें हें मराठे व राजपूत लोक करते तर या सर्व लोकामध्ये सलोखा राहून देशांत किती बखेडे व तंटे बंद होऊन लोक आनंदांत राहते. "

## ३ उज्वल भविष्याबद्दल आत्मविश्वास.

दादोबा पांडुरंग यांना आपल्या देशाच्या उज्वल भविष्याबद्दल खात्री होती. म्हणूनच ते म्हणतात .... (१) " ईश्वराने या देशांत इंग्रजांची प्रेरणा केली आहे. तेव्हा या साक्षात शहाणे लोकांची गाठ पडून हिंदुलोकांच्या वाईट चाली बहुत सुटल्या व आणखीही कित्येक सुटतील. आणि यांचीं मनें

(१) दादोबा पांडुरंग ... दादोबा पांडुरंग... पृष्ट १११

(१) दादोबा पांडुरंग उत्तरार्ध- चरित्र लेखक श्री.अनंत काकबा प्रियोळकर, पृष्ट २७१,२७२

शुद्ध होऊन यास राज्यकारभार, व्यापारधंदा कसा करावा हें ज्ञान येईल. देशसुधारणा क्षणांत होत नाही. तीस पुष्कळ विलंब लागतो. ल्हान मुलास हुशार होण्यास दहावीस वर्षे लागतात. मग देश चांगला होण्यास अर्थातच दोनशें चारशें वर्षे लागतील. तो पर्यंत या लोकास दु:ख आहे. परंतु त्यास उपाय नाही. जशी शाळेमध्ये मुलांनी शिक्षा घेतली पाहिजे तव्दत हें आहे. यापासून उत्तम फळ पुढे येईल. या लोकांच्या पायांतील शृंखला सुटतील.

इकडील लोक राज्याचा कारभार चांगला करूं लागले, लांच खाण्याचे सोडून दिले, म्हणजे बहुतकरून मोठालीं गवरनरची कामें सुद्धां यांचे हातीं येतील आणि मग अर्थातच इंग्रज फक्त व्यापार मात्र करून राहतील. म्हणजे जसे हिंदुस्थानांत प्रथम इंग्रज आले त्या स्थितीवर येतील आणि आपले लोक पार्लमेंट व स्वराज्य भोगतील. राज्यकारभारांत व व्यापारांत त्यास महत्त्व प्राप्त होईल आणि मग परदेशाशीं देखील व्यापार करतील. असे हे लोक प्रबळ झाले म्हणजे इंग्रजांचे काही दिवस पर्यंत आभार मानतील. कारण की त्यांचे योगाने हे ज्ञानी झाले. परंतु जर इंग्रज गडबड करूं लागतील किंवा काही नवीन कानून बसवाव्याचा आग्रह करतील तर त्या काळी अमेरिकेंत झालें तसें होऊन हे लोक स्वतंत्र करून घेतील, आणि इंग्रजास सांगतील की " तुम्ही आपले देशास जावे. आता आमचे देशाचा कारभार आम्हास चांगला कळतो. तुमचे गुरुत्व नको. तुम्ही पाहिजे तर व्यापारा पुरते इकडे येत जा. आमच्या प्रजेचें जसें आम्ही रक्षण करतो तव्दत तुमचेंही करूं. परंतु तुमचें वर्चस्व नको. या प्रमाणे या देशाची गती होईल आणि नवीन राज्यस्थिती चांगले रितीची होईल. पहिलें अज्ञान अगदी नाहीसें होईल. यास दोनशें वर्षे तरी पाहिजेत. परंतु असें होईल यांत संशय नाही. अशी मागले इतिहासावरून कल्पना येते. आणि हें तथ्य आहे अशी खातरजमा आहे. "

++ ++ ++

४

## आपल्या अवनतीचीं कारणें.

दादोबा पांडुरंग यांचें मत असें की आपल्या अवनतीस आपणच कारण आहोंत ... (१) " पण यांत सारा दोष आपल्याच लोकांचा आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. हें जें सगळें झालें आहे तें आपल्या लोकांच्या दुर्बलपणामुळें व विचाररहितपणामुळें झालें आहे. पहिलीवहिली आपल्या देशांतील एक वाईट गोष्ट आहे ती ही की, शस्त्रधारण एकच जात करते, बाकीच्या जाती करीत नाहीत. तसेंच ब्राम्हण लोकांना स्वत: राजासारखें सुख असावें अशी चिंता; परंतु प्रजेबद्दल काहीच काळजी नाही. त्यामुळे आपला देश परकीय राजांच्या हातीं गेला. पण जर आपत्तीच्या वेळी सर्व प्रजेने हातांत शस्त्र घेऊन इतर देशांतील प्रजेप्रमाणें ती लढली असती आणि ब्राम्हण लोकांनी प्रजेची काळजी वाहिली असती तर स्वदेशरक्षण झाल्याखेरीज राहिलें नसतें. याबद्दल मोठाच ठपका आम्ही आचार्य लोकांना देतो. कारण आपल्या देशांतील लोकांमधील जो एकचित्तपणा नष्ट झाला आहे, तो या भिकारी गुरूंनी उलटसुलट दिलेल्या शिकवणीचा परिणाम होय. दुसरी गोष्ट ही की आपल्या देशांतील लोक विद्येचा अभ्यास करीत नाहीत. निरनिराळ्या देशांचे वृत्तांत वाचीत नाहीत. त्यामुळे अज्ञान वाढलें आहे. तसेंच जुन्या शास्त्रावर आपले लोक फाजील विश्वास ठेवतात. काही विचार करीत नाहीत. धर्माच्या आडकाठीमुळे वाहनांत बसून दूरदेशामध्ये जात नाहीत. त्यामुळे इतर देशांतील कला कौशल्याची त्यांना माहिती नाही व त्या देशांतील लोक करीत असलेल्या विद्यांमध्ये व कलांमध्ये ते मागे पडले आहेत. यामुळेच सारा व्यापार बसला आहे. आतां हाच उपाय राहिला आहे की आम्ही विद्या व कला यांचें ज्ञान संपादन करावें नीतीमान व्हावें. "

---

(१) दादोबा पांडुरंग .. दादोबा पांडुरंग - पृष्ठ २८०

## ९ राष्ट्रीय शील वाढलें पाहिजे

आपल्या लोकांत राष्ट्रीय चारित्र्याची जोपासना झाली पाहिजे असें दादोबांना वाटतें.

(१) " गेल्या सवाशें दीडशें वर्षांत हिंदी लोकांनी इंग्रजी विद्या व नव्या प्रकारचें त्यांचें राज्यकारभाराचें तंत्र पूर्णपणें आत्मसात करून घेतलें आहे. इंग्रजांपेक्षाही ते हिंदुस्थानचा राज्यशकट चांगल्या प्रकारे हाकू शकतील अशा प्रकारच्या अपेक्षा निर्माण झाल्या आहेत. परंतु इंग्रजांचें राष्ट्रीय शील National Character अद्याप आपल्या ~~ब्याच~~ बऱ्याच लोकांना आपलेसें करता आलेलें नाही, हेंही तितक्याच प्रांजलपणें कबूल केलें पाहिजे. ज्या ज्या वेळी राष्ट्रहिताचा प्रश्न येईल त्या त्या वेळी वैयक्तिक बडेजाव व स्वार्थ यांना दूर सारून देशाकरिता एक होणें, हेंच तें राष्ट्रीय शील होय. ही राष्ट्रीय नीति किंवा शिस्त जोंपर्यंत आपल्या ~~अंगांत~~ अंगांत बाणली नाही तोंपर्यंत आपलें इतर सारें ज्ञान व्यर्थ आहे. "

** ** **

---

(१) दादोबा पांडुरंग
दादोबा पांडुरंग
पृष्ठ ४००

६ सा मा जि क

१ मी जातीभेद कसा मोडला?

सुमारें शंभर वर्षां पूर्वी जातीभेदाच्या आणि खाण्यापिण्याच्या कल्पना लोकांत कशा होत्या तें पाहा ...

(१) " मी जरी कित्येक सुधारलेलीं मतें अवलंबिलीं होतीं तरी मी आपल्यास ' सुधारलेला ' म्हणवीत नसे, व सुधारलेल्यांच्या मंडळींत मोडावयास इच्छित नव्हतो. कारण त्या काळांत हा शब्द मुंबईत व विशेषे करून पुण्यात फार निंद्य असे. ' सुधारलेला ' या शब्दाची व्याख्या जातीचे आचार मोडणारा, मद्यमांस खाणारा व चौपायीं उडणारा अशी जुन्या समजुतीचे लोक करीत, ती मला आवडत नसे. तरी मागल्या प्रकरणात सांगितलेल्या माझ्या मित्रांच्या सहवासाने माझा प्रवेश परमहंस मंडळींत झाला. हे मित्र त्या मंडळीचे सभासद असून गुप्त रीतीने दुसर्‍यास तींत आणण्याचे प्रयत्न करणारे होते. एके दिवशी ह्यांनी माझ्याशी व माझ्या मताच्या एका मित्राशी जातीभेदाविषयी फार निकराने वाद केला, आणि जेव्हा जातीभेद खोटा आहे व तो मोडावयास सिद्ध आहो असें आम्ही कबूल केलें, तेव्हा ते म्हणाले की आताच आमच्या देखत तुम्ही तो मोडाल काय? आम्ही म्हटलें " होय. "

परंतु खरोखर तो मोडण्यास ते सांगतील असें आम्हास वाटलें नाही. पण आमचें संभाषण होत असता त्यांतून एकजण मुकाट्याने बाहेर जाऊन थोड्याच वेळाने काही बिस्कुटें घेऊन आला व तीं आमच्यापुढें ठेवून म्हणाला की " जर

(१) अरुणोदय ... बाबा पदमनजी ... पृष्ठ ५४.५५

तुम्हाला जातीभेद खोटा वाटतो, तर ही खा पाहूं."

आम्ही म्हटलें "प्रथम तुम्ही खा. मग आम्ही खाऊं." तेव्हां त्यांनी त्यांतून काही खाल्लीं. मग आम्हासही खाणें प्राप्त झालें. परंतु त्या वेळी माझी जी गाळण झाली ती सांगता पुरवत नाही. माझ्या अंगास कंप सुटून चळचळां घाम आला, व आता घरी गेल्यावर आई घरांतून हाकून लावील असें वाटूं लागलें. जसा काही एखाद्यावर डोंगर कोसळून पडतो तशी माझी गत झाली. आता मी कुटुंबाच्या सर्व माणसास मुकलों व जातींतून उठलों, परागंदा झालो सर्वजण मला 'बाट्या' म्हणतील असें वाटूं लागलें. कारण तो पर्यंत मी कधी पावबिस्कुटें खाल्ली नव्हतीं. माझा दुसरा मित्रही फार चकीत झाला. त्यानेही धीर धरून एक दोन बिस्कुटें खाल्लीं. त्याजवरही हा पहिलाच प्रसंग होता, म्हणून त्याच्या घशाखाली तीं उतरण्यास त्याला बराच प्रयास लागला. मग आम्हास ग्लासात पाणी आणून दिलें. ही गोष्ट मनीस्कुलांत झाली. त्यावेळीं शाळा सुटली होती. ह्याप्रमाणें जातीभेद गुप्तरूपाने प्रथम हिंदु मित्रमंडळीतच मी मोडला. जरी माझें त्याकाळी कित्येक ख्रिस्ती लोकांच्या घरी जाणे येणें होतें तरी मला कोणी खाण्यापिण्याविषयी आग्रह केला नाही. सांप्रतच्या काळांतही सुधारलेले हिंदु लोक आपसांत गुप्त रीतीने अशाच प्रकारें जातीभेद मोडीत आहेत, त्या करिता त्यांस ख्रिस्ती लोकांची मदत लागत नाही.

उइल्सनसाहेबांनी मी हिंदु असतांना जात मोडण्याच्या संबंधाने एकदा आम्हाला वर्गांत जो उपदेश केला तो सांगणें अवश्य दिसतें. त्यांचें म्हणणें असें होतें कीं, कोणीही हिंदूने उगीच खाण्यापिण्याकरितां आपली जात मोडू नये, तर जातीभेद पाळणें पाप आहे व ईश्वराला तें आवडत नाही अशी ज्याची खातरी झाली असेल त्यानेच तो मोडावा, म्हणजे त्याबद्दल त्याचा छळ झाला

असता तो सोसण्यास त्याला ईश्वर शक्ति देतो. अशा श्रेष्ठ तत्वरूप कुऱ्हाडीने ह्या जातीरूप वृक्षावर प्रहार करणारे किती थोडे आहेत. मी ख्रिस्ती झाल्यावर त्याच उइल्सन साहेबांच्या बंगल्यात दुसऱ्या दोन तीन ख्रिस्ती भावासह राहात असता पुष्कळ तरुण हिंदु आमच्या बिऱ्हाडी येऊन आम्हाला बीफ कसें लागतें तें खाऊन पाहू द्या असें म्हणत. आणि काही खाणें झालें तर दारें बंद करून खात."

२ — भिकाऱ्यांच्या पदरीं उष्ट्या पत्रावळी.

उष्ट्या पत्रावळीसाठी भिकाऱ्यांची धडपड पाहून बाबा पदमनजींना काय वाटलें तें पाहा ....

(१) "आमच्या गल्लींत ब्राम्हणांची वस्ती फार होती. त्यांत उपाध्ये, जोशी, पुराणीक, हरदास, भटभिक्षुक, सराफ, वैद्य, पुजारी हे होते. कोर्टाचे मुनसफ व संस्थानिकांचे वकील, कलेक्टर साहेबांचे दिवाण (दप्तरदार) मामलेदार, खजीनदार, मुनशी, चिटणीस, कारकून, इंजनेर खात्याचे सरवेयर असे मोठमोठे सरकारी कामदारही रहात असत. आमच्या शेजारी एका बाजूस जोश्यांचें घर व दुसऱ्या बाजूस एक घर सोडून वेदशाळा होती, तसेंच जोशांचे घरीं तिथिपर्वणींचा निश्चय करण्यास वारंवार भटांची मंडळी जमत असे. ह्या वस्तींत ब्राम्हणांच्या मोठमोठ्या समाराधना व्हायाच्या. धनवान गृहस्थ वारंवार ब्राम्हण भोजनें घालीत. ब्राम्हण जेवले म्हणजे लोकांच्या दारापुढें रस्त्यांत आंचवायास येत तेव्हां त्यांची येथून तेथून मोठी रांग लागत असे. व त्यांच्यापुढे जवळच म्हार, मांग, डोंबारी भिकारी हे ब्राम्हणांच्या पात्रावरील

---

(१) अरुणोदय - बाबा पदमनजी - पृष्ठ ३.

उष्टें मिळण्यासाठी मोठी याचना करीत व लाळ घोटीत बसलेले दृष्टीस पडत. ब्राम्हणास यथास्थित तूपपोळ्या कां मिळतात व भिकाऱ्यांच्या पदरीं त्यांच्या उष्ट्या पत्रावळी कां पडतात हें माझ्या लक्षांत त्या वेळीं आले नाही. आलें असेल तर देवानेंच त्यास ह्या नीचस्थितींत घातलें आहे असें मात्र वाटलें असेल."

**२ — दक्षिणा दुप्पट द्यावी लागे.**

त्या वेळी भिक्षा मागण्याची काही ब्राम्हणांची रीत कशी होती तें बाबा पदमनजी पुढील प्रमाणें सांगतात (१) " आमच्या घरी तैलंग ब्राम्हण येऊन मोठ्याने आशिर्वाद देऊन दक्षिणा मागत. गांवांत पुराणिक वगैरे ह्यांची बिदागी किंवा संभावना करायाची असली म्हणजे वर्गणीची याद किंवा टाट आमच्याकडे येत असे. वर्गणी पटावर आकडा मांडण्याची कित्येकांची अशी युक्ति होती की १० रुपये मांडून १ रुपया द्यावा, म्हणजे दुसऱ्याने १० चा आकडा पाहून ५ तरी घालावे, किंवा आपल्या घरचें मोलवान पागोटें ज्याची संभावना करणें असेल त्याच्या डोईंत घालावें, व एखाद्या रेशमी किनारी धोतराचें नवें कोरें पान त्याच्या अंगावर टाकावें म्हणजे त्याने लोकांत सांगत फिरावें की हें मला अमक्याने दिलें. नंतर तें ज्याचें त्यास परत करावें . हे वर्गणीची याद फिरविणारे किंवा वर्गणी घेणारे ह्यांच्या सूचनेवरून बहुधा होत असे.

ह्या ब्राम्हणांची चाल अशी होती की, यजमानाच्या घरीं जाऊन त्यास प्रथम काही विचारपूस केल्याशिवाय एकदम मोठ्याने मंत्रघोष करावा व यजमानाच्या मस्तकावर अक्षता टाकाव्या. हें त्यांचें उद्धटपणाचें वर्तन माझ्या

(१) अरुणोदय - बाबा पदमनजी - पृष्ठ ८

वडिलास अगदी आवडत नसे. तरी त्यांनीं त्यास यथाशक्ति दक्षिणा देऊन त्यांची संभावना करावी. ते थोडक्यात कधीं तृप्त होत नसत. अगोदर यजमानाची स्तुति करीत. परंतु शेवटी (त्यास पुष्कळ न दिल्यास) त्यांची निंदा करीत. ह्या ब्राम्हणांचा धिक्कार करण्यास ह्या त्यांच्या वर्तनावरून मी लहानपणापासून घरातच शिकलों. इतर ब्राम्हणास दक्षिणा देतेवेळी ह्यास दुप्पट द्यावी लागत असे. हा आम्हास पेशव्यांनी दिलेला हक्क आहे असें ते म्हणत."

४

## त्यांनीं आपल्या दारे खिडक्या बंद केल्या

जातीजातीमुळे मनुष्य माणुसकीलाही कसा मुकतो याचें उदाहरण दादोबांच्या आयुष्यात घडलें. तें पुढील प्रमाणें.....

(१) " मी सुरतेत असता मुंबईहून आलेला एक आठ नऊ महिन्यांचा बाळा या नांवाचा तान्हा मुलगा मरण पावला. त्या वेळेस मी आणि माझें कुटुंब अशीं दोनच माणसें होतों. मुलाची आई तर त्यास घेऊन रडायास बसली. आमच्या समोर दोन चार परभांचीं घरें होतीं. त्या घरात त्या बायकांनी तर हा आक्रोश ऐकून आपल्या घराचीं व खिडक्यांचीं दारें बंद केलीं. मी त्या बालकास मूठमाती देण्याच्या मोठ्या विचारांत पडलों. दुर्गाराम मेहताजी व त्यांची मावशी आणि दिनमणीशंकरशास्त्री व त्यांची आई यांस हें वर्तमान कळताच ते व दुसरे एकदोन नागर गृहस्थ आमच्या घरीं येऊन त्या बालकास तापीच्या काठी मूठमाती दिली. परंतु त्या प्रसंगीं आमच्या देशाचे परभू असून त्यांनीं आपलीं दारें खिडक्या बंद केल्या. परदेशात यांच्या जातीचे येथे कोणी नाहींत,

---

(१) दादोबा पांडुरंग .. दादोबा पांडुरंग ... पृष्ट १९१

आपण त्यास मदत करूं हा विचार यांच्या मनांत सुद्धां आला नाही. त्यांत आणखी त्यांचे मुलगे आमच्या शाळेंत शिकत होते."

## ६ केवळ नाइलाजाने ठराव मंजूर झाला.

हिंदुसमाजांतील लोक जातीभेदामुळे खेळांतही जातीय वृत्तीने वागतात. याचा अनुभव एका क्रिकेटपटूला कसा आला त्याचा पुढील मासला पहा.

(१) "त्यावेळी पुण्यात 'यंग मेन्स हिंदु क्लब' या नांवाचा एक नामांकित क्रिकेट क्लब होता. भिडे, देवधर, परांजपे, बापट, दाते, वगैरे पुण्यांतील त्या वेळचे उत्कृष्ट क्रिकेटपटू या क्लबांत होते. या क्लबांत केवळ अस्पृश्य म्हणून पी. बाळू यांना प्रवेश मिळू शकत नाही. हें कळताच मेजर ग्रेग याने स्वतःच्या सहीने वृत्तपत्रांत एक लेख लिहून या क्लबच्या जात्यंध धोरणावर सडकून टीका केली, व केवळ या संकुचित धोरणामुळे हिंदु संघ एका उत्कृष्ट बोलरला गमावून बसत आहे, या बद्दल हिंदूना त्याने दोषही दिला. या पत्राचा परिणाम झाल्यामुळेच की काय, पी. बाळूंना क्लबमध्यें घेण्याबाबतचा निर्णय करण्यासाठी क्लबच्या सभासदांची एक खास सभा भरली. पण जातीभेदाची पकड सभासदांच्या मनावर इतकी होती की या सभेतही बहुमत पी. बाळूंच्या विरुद्ध पडलें. अखेरीस तेलगू खेळाडूंनी रा. बाळूंना न घेतल्यास आपण राजीनामा देऊं अशी निर्वाणीची भाषा काढताच केवळ नाइलाजाने रा. बाळूंना क्लबांत घेण्याचा ठराव मंजूर झाला. आणि पुण्याच्या हिंदु संघांत अशा रीतीने रा. बाळूंचें नाव दाखल झालें."

---

(१) माझें क्रीडा जीवन .. पी. विठ्ठल - पृष्ट ११

६

## रूपरंगापेक्षा कुलीनतेवर जास्त विश्वास.

न्यायमूर्ति रानडे हे रंगरूपापेक्षा कुलीनतेला अधिक महत्त्व देतात.

(१) " मी व माझे वडील व बाळंभटजी टपालाच्या टांग्यातून पुण्यास आलों. मध्यंतरी लग्न न करण्याबद्दल स्वतःचे मामंजींशी पुष्कळ बोलणें असें झालें की " मला लग्न करावयाचें नाही. मी आता काही लहान नाही. मला ३२ वें वर्ष आहे. तेव्हा मला विचाराने राहण्यास काही हरकत नाही. कारण दुर्गा माझ्याहून वयाने लहान असून वयाच्या एकविसाव्या वर्षापासून अनाथ झाली आहे. आपलें प्रेम मजपेक्षा तिच्यावर कोणत्याही रीतीने कमी नाही. असें असतांना तिच्याबद्दल काही विचार होत नाही. मग मलाच लग्न करण्याचा आग्रह कां असावा? तिनें व्रतस्थ रहावें हें चांगलें असें आपल्याला वाटत असेल तर तें आम्हा दोघांनाही सारखेंच लागू आहे. कदाचित मी तसाच राहिल्यास पुनर्विवाह करीन अशी आपणास भीति वाटत असेल तर मी तो करणार नाही, असें आपल्याला वचन देतो. त्याबद्दल आपणाला काळजी नको. "

अशा पुष्कळ प्रकारांनी विनविले, तरी मामंजी आपलें बोलणें सोडीनात. जास्तच रागावले. तेव्हां सांगितलें की " आपण जरी माझें म्हणणें ऐकत नाही तरी मला आपलें म्हणणें ऐकलेंच पाहिजे. आणखी सहा महिने आपण मला मोकळे राहू द्यावें. म्हणजे तो पर्यंत मी विलायतेस जाऊन येईन."

हें म्हणणें सुध्दा मामंजी कबूल करीनात. तेव्हा असा निरोप पाठविला की " आपण माझे काहीच चालू देत नाही, व मला लग्न करावयास लावणारच तर निदान एवढें तरी ऐका. जिच्याशी लग्न करावयाचें ती मुलगी

(१) ' आमच्या आयुष्यातील आठवणी ' - रमाबाई रानडे ..पृष्ट २२

गांवांतील नको, परगावची असावी. घराणें कुलीन व नावाजलेलें असावें. तसेंच त्यांचे इतर संबंध चांगल्या माणसांशी आहेत, याबद्दल खात्री करून घेऊन मग ठरवावें. गांवांतील मुलगी मला मुळीच नको. रूपाकडे पाहून व वयाने मोठी आहे म्हणून एखाद्या साधारण घराण्यांतील मुलगी मला नको आहे. रूपारंगापेक्षा कुलीनतेवर जास्त लक्ष ठेवलें तर तो संबंध अधिक सुखाचा तरी होईल."

७

## बापाचा मुलीला उपदेश

मुलगी सासरी जायला लागली की आईवडील उपदेश करतात ही गोष्ट अनादिकालापासून चालत आली आहे. रमाबाईंच्या वडिलांनी पुढील उपदेश केला होता.

(१) " मी प्रथम सासरी येतांना माझ्या वडिलांनी मला जवळ घेऊन उपदेश केला की " हे बघ तू आपल्या सासरी जात आहेस. सख्या सावत्राचे कुटुंब. पदरी दहात,हेची माणसें आहेत. तू माझी मुलगी आहेस. आपल्या कुलीन घराण्याला शोभेल असें वाग. तुला कितीही त्रास झाला तरी सोस. पण नोकरांना सुद्धा उलटून बोलू नकोस. हें एक व दुसरें तुझ्या मनाला असह्य झालें तरी तू होऊन कोणाचीच चहाडी नवऱ्याजवळ सांगत जाऊ नकोस. चहाडीने कुटुंबाचाच नव्हे पण राज्याचाही नाश होतो. ह्या करिता मी सांगतों हीं दोन व्रतें पाळ. म्हणजे तुला कधीं काहीं कमी पडणार नाहीं. तू भाग्यवान आहेस. सोशिकपणा हा तुझा गुण झाला म्हणजे तू खऱ्या किमतीला चढशील व आमच्या कुलांत जन्म घेतल्याचें सार्थक करशील. हें माझें बोलणें लक्षांत ठेव. याच्या उलट वागतेस असें ऐकलें तर मी कधीं फिरून तुला माहेरी आणणार नाहीं. "

---

(१) आमच्या आयुष्यांतील आठवणी - रमाबाई रानडे पृष्ठ ४२

८

## बोलून चालून महारीण

जातीजातींमुळे आपल्यापैकी काहींचें वर्तन कसें माणुसकीला सोडून होत होतें त्याचा नमुना पहा ....

(१) " अस्पृश्य मानलेल्या वर्गातील व्यक्तीशी आमच्या समाजाकडून अत्यंत अमानुष असें वर्तन होत असून त्याची आम्हास नुसती जाणीवही कशी नसते, याचा पुण्यास असतांना मला एकदा कधीही न विसरण्यासारखा जो अनुभव आला त्याची थोडीशी हकीकत देऊन हा भाग संपवितो. मोदीच्या गणपतीजवळ दामले यांच्या वाड्यात मी रहात होतों. त्यावेळी माझ्या एका स्नेह्याचे एक नातलग खाणावळींत जेवून माझ्या बिऱ्हाडी निजत असत. हे देवी डॉक्टर असून यांना नेहमी शेजारच्या खेड्यापाड्यांत जावें लागत असे. एके दिवशी संध्याकाळीं हे घरीं आले, तेव्हा त्यांचें काही सामान घेऊन एक महारीण त्यांच्या बरोबर आली होती. आपल्या गांवाहून निघतांना आपल्याला फारसा काळोख पडण्यापूर्वी परत आपल्या गावीं जाता येईल या समजुतीने तिने बरोबर भाकरी अथवा घोंगडी वगैरे काही आणलें नव्हतें. परंतु वाटेंत देवी डॉक्टरांची काही कारणामुळे खोटी होऊन त्यांना पुण्यास येण्यासच दिवे लागले.

ते आल्यावर त्या महारणीच्या खाण्यापिण्याची अथवा राहण्याची काहीएक विचारपूस न करता खानावळींत जेवून येऊन ते झोपी गेले. या दिवशी मला बाहेरून घरीं येण्यास थोडासा उशीर झाला होता. मी जेवण करून माडीवर गेल्यावर विडी ओढीत ओढीत सहज त्या माडीला रस्त्याकडच्या बाजूला एक

---

(१) ' माझा जीवन वृत्तान्त ' सी.ग.देवधर, पृष्ठ १२५-१२६.

लहानसा सज्जा होता, तेथे जाऊन खाली तोंड करून थुंकू लागलो. तो शेतखाना व नाला यांच्या दरम्यान भैय्याला पाटी ठेवता यावी म्हणून केलेल्या लहानशा ओट्यावर (पुण्याचे शेतखाने बहुधा दाराशीच असतात हे प्रसिद्धच आहे) कोणी तरी बसलें आहे असें मला दिसून आलें. खाली जाऊन शोध करता ती देवी डॉक्टरा बरोबर आलेली महारीण असून काळोखांतून परत आपल्या गांवी एकटी जाण्याचा तिला धीर न झाल्यामुळे व दुसऱ्या कोठे निवाऱ्याची जागा मिळणें शक्य नसल्यामुळे त्या ओट्यावरच कशीतरी रात्र काढावी असा बेत ठरवून, नेसलेल्या फाटक्या लुगड्याशिवाय दुसरें काही जवळ वस्त्र नसल्यामुळे थंडीने कुडकुडत ती तशीच तेथे बसली होती, असें मला कळून आलें. तिला खाण्यास भाकरी घालणें मला कठिण नव्हतें व ती करण्यास लागलीच मी बायकोला सांगितलें. परंतु तिला रात्रीच्या निवाऱ्याची सोय कोठे करावी हा प्रश्न सोडविणें सोपें नव्हतें.

घरांत राहोच पण रस्त्याकडच्या लहानशा सज्जावर तिला निजूं दिल्या सही दुसरे दिवशी बिऱ्हाड सोडण्याची कदाचित नोटीस मिळण्याची ही भीती होतीच. अशा स्थितींत काय करावें हें प्रथम काही वेळ मला सुचेना. इतक्यांत मला आठवण झाली की माझे प्रियमित्र व नगरचे माझे सहाध्यायी माधवराव जोशी हे जवळच एका लहानशा घरांत रहात असून त्यांचे मालक पुण्यांत रहात नसल्यामुळे ते स्वतंत्र असत. शिवाय त्या घरापुढे अंगण व बाहेरचा रस्ता यांच्या दरम्यान एक लहानशी पडवी असून रस्त्यांत जाण्याचें दार या पडवीच्या एका बाजूस होतें. या पडवींत रात्रीची या महारणीची निजण्याची सोय करता येईल असें वाटून मी लागलीच त्यांच्याकडे गेलो. त्यांची माझ्या योजनेस संमती मिळणें मुळीच कठिण पडलें नाही, हें सांगण्यास नकोच. तेथे तिला नेऊन तिची भाकरी खाऊन झाल्यावर तिच्या अंथरुण पांघरुणाची शक्य ती तजवीज केली व त्या पडवींत

तिची निजण्याची सोय लावून मी परत घरीं गेलों. दुसरें दिवशी सदर देवी डॉक्टरास तुम्ही त्या बाईची काहीच वास्तपुस्त कशी केली नाही असें विचारता त्यांना आपल्या बेपर्वाईबद्दल यत्किंचितही वाईट न वाटता उलट माझ्या प्रश्नाचेंच त्यांना आश्चर्य वाटून ते म्हणाले की ती बोलून चालून महारीण, तिची वास्तपुस्त ती काय करायची ? "

१

या निर्दय समाजावर बाटगे लोक सूड उगवितात

परधर्मीयांची संख्या वाढायला आपणच कसे कारणीभूत होत आहोंत हें पुढील उताऱ्यावरून दिसून येते: -

(१) " वासुदेव पाटणकर या नांवाचा आमचे आळीतला एक मुलगा सुटीचे दिवशी इतर मुलाबरोबर रानांत सूरपारंब्याचा खेळ खेळावयास गेला. त्याच ठिकाणी एक तेली जातीचा मजूर काम करण्यास आला होता. खेळ खेळून दमल्यामुळे वासुदेवास सपाटून भूक लागली म्हणून ती शमविण्यासाठी त्या तेल्याची भाकरी वासुदेव पाटणकर याने खाल्ली. खेळ खेळल्यामुळे व त्याला फारच भूक लागल्यामुळे त्याने ती भाकरी खाल्ली होती. नंतर ही बातमी इतर मुलांनी गांवांत सर्वांना सांगितली. तेव्हा ~~गांवकऱ्यांनी~~ गांवकऱ्यांनी ' वासुदेव तेली झाला ' असें ठरविलें. त्यावेळी धर्माचे ~~प्राबल्य~~ प्राबल्य एवढें मोठें होतें की प्रत्यक्ष आईबापांना मुलगा घरांत घेववेना. अखेर वासुदेव पाटणकराचा वाशा तेली झाला व तो पोटासाठी तेल्याचे घरी चाकरी करून घाणा हाकू लागला. एखादे वेळी करमणुकीसाठी

(१)' मी कारखानदार कसा झालो ?'. वि.रा.वेलणकर - पृष्ठ १४

वासुदेव आमच्या आळीत येई, पण दुर्दैव असे की त्याचा सर्वांकडून धिक्कारच होई. मीही त्याचा धिक्कार करणारात सामील होत असे. याचा मला आता पश्चात्ताप वाटतो.

खरोखर आमच्या अशा धर्मभोळेपणामुळेच ख्रिश्चन, मुसलमान वगैरेंची संख्या आम्हीच वाढवून ठेविली आहे. या निर्दय समाजावर बाटगे लोक सूड उगवितात, हे निसर्गाला धरूनच घडते आहे. ”

१०

## महाराष्ट्राचे ऐक्य साधावयाचे तर .....

" जाती निर्मूलन झाले तरच हिंदु समाजाची एकमूस होऊन प्रगति होईल असा विचार श्री. माधवराव बागल यांनी मांडला आहे.

(१) “जाति निर्मूलनाशिवाय महाराष्ट्राचे खरे ऐक्य साधणार नाही. त्यासाठी परिणामकारक उपाय म्हणूनच या प्रश्नाकडे निःपक्षपाती दृष्टीने पाहिले पाहिजे. आणि महाराष्ट्रातून जातिनिर्मूलन व्हायचे तर मराठा जातीची घडण इतर कोणत्याही जातीहून अनुकूल आहे. अगदी पुरातन काला पासून पाहिले तरी तिची परंपरा जाति विध्वंसनाला फार अनुकूल आहे. मराठा ही जात संग्राहक आहे. ब्राम्हण जाती सारखी ती सोवळी नाही. ब्राम्हण, जैन, लिंगायत, कुणबी, साळी, माळी, लोहार, कुंभार, सुतार, धनगर अशा पैकी कोणाचेही पाणी मराठ्याला चालते. तिने इतर सर्व जातीयांचा आपल्या जातीत समावेश करून घेतला आहे. थोर कुळींच्या म्हणून मानल्या गेलेल्या शहाण्णव

---

(१) ' जीवनप्रवाह ' श्री. माधवराव खंडेराव बागल - पृष्ठ २१९

कुळींच्या मराठ्यांचे धागे दौरे कमी समजलेल्या जातींत जाऊन पोहोचले आहेत. अनेक जातींशी लग्न संबंध आणि शरीरसंबंध झालेली मुलें मराठा जातींत कालांतराने मोडली गेली आहेत.

श्री छत्रपती हे तर मराठ्यांचे आद्य दैवत. त्या छत्रपतींनी मुसलमान झालेल्या निंबाळकराला ' तू मराठाच आहेस ' असें म्हणून जवळ केलें आणि त्याच्याशी सोयरीक केली. शाहू छत्रपतींनी तर फारच पुढची मजल गाठली. मूळ पाटाची चाल असलेल्या घराण्याशी, तसेंच होळकर या धनगर घराण्याशी लग्न संबंध जोडले व पुढाकार घेऊन आपल्या वाड्यावर अशीं अनेक लग्नें आपल्या प्रोत्साहनाने आणि खर्चाने घडवून आणलीं. पावित्र्याचा समजलेला हा धागा शाहू महाराजांनी आपल्या हातानेच तोडून टाकला. सर्वांनी मोठ्या आढ्यतेने आपल्या जातीचे संबंध जेथे जोडायचे तो मोठेपणाचा आधारच त्यांनी नाहीसा केला. आज कोल्हापुरांत मराठा- ब्राम्हण, मराठा - मुसलमान, मराठा अन्य जातींची अशीं कितीतरी लग्नें झालीं आहेत. एकदोन पिढ्या गेल्या की ती एकरूप होऊ शकतात. लग्नाच्या विलग्नाच्या इतर जातींत थारा नसलेल्या मुलांना मराठा जातीने आपल्या पोटांत घेतलें आहे. अशी ही जात आपोआपच सब गोलेंकारी बनत चालली आहे. धर्मगुरूंच्या आज्ञेने किंवा संस्काराने बनत चालली आहे असेंही नाही. यांत कट्टर जात्याभिमानी नाहीत असें नाही. पण त्यांची ही कल्पना व्यवहारात टिकू शकलेली नाही. कारण त्यांचे पाहुणे पैते संबंध त्यांना तोडता येत नाहीत. हीच एक जात सर्वांना जवळ करू शकते. ' मी मराठा जातीचा आहे ' असें म्हणणारा पूर्वी कोणत्याही जातीचा असो, त्याला मराठा जातींत कोपऱ्यांत का असेना जागा मिळते. पुढे त्याचा आत प्रवेश होत जातो. तसे मी ब्राम्हण आहे, जैन आहे, किंवा लिंगायत आहे असें म्हटल्याने त्या जातींत समावेश केला जात नाही. याच उदार धोरणामुळे जाती निर्मूलनाला

ही विशेष अनुकूल अशी जात आहे. जात नसलेली जात कोणती तर ती मराठा अशी वस्तुस्थिती आहे. यामुळे इतर जाती मराठ्यात गेल्याने जाती निर्मूलनाचा मोठा टप्पा गाठला जाणार आहे.

वार्गिक दृष्टयाही या जातीला महत्त्व आहे. कष्ट करणारा शेतकरी, कामगार व खालचा नोकरही याच जातींत जास्त आहे, म्हणून वार्गिक दृष्ट्या तो अस्पृश्य वर्गालाही जवळचा आहे. या श्रमजीवी लोकांची संस्कृती आचार विचार अन् महत्त्वाकांक्षा यात साम्य आहे. मोळी विक्या कुणबी अन मोळी विक्या अस्पृश्य यांत असें अंतर दिसणार नाही. शेतांत काम करतांना, गिरणींत मजूरी करताना व हमाली करतांना ते परस्परा जवळ आले आहेत. ब्राम्हण आणि महार यांत जसें अंतर आहे तसें मराठा आणि महार यांत नाही. त्यातही महात्मा ज्योतिबा फुले, विठ्ठल रामजी शिंदे, शाहु महाराज, व सयाजीराव महाराज यांनी त्यांना वर आणण्याचा खूप प्रयत्न केला. या बाबत शाहू महाराजांनी केलेलं काम हें चिरस्मरणीय स्वरूपाचे आहे. कोल्हापुरांत तरी ही विजमता फारच कमी आहे. कोल्हापुरांत नगराध्यक्षाचा मान हरिजनाला मिळाला आहे. म्हणून सर्वच जातींनी मराठा जातीकडे महाराष्ट्राच्या आशेचे स्थान म्हणून पाहिले पाहिजे. "

११

## बहुजनसमाजांत समतेचें बीज रुजलें तर ...

बहुजन समाजांतील पुढाऱ्यांनी समतेचें बीज पेरण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे.

(१) " महाराष्ट्रांत सत्यशोधक समाज फार लवकर फोफावला कारण त्या संस्थेने बहुजन समाजाच्या प्रश्नास हात घातला होता. त्या संस्थेतले पुढारी मराठादी बहुजन समाजांतीलच होते. ते बहुजनसमाजाच्या जीवनाशी व सुखदु:खाशी अधिक समरस होऊ शकत होते. प्रार्थनासमाजाची तत्वे कितीही उच्च असली तरी त्या पक्षाचे नेतृत्व पांढरपेशाकडे असल्यामुळें तो पक्ष मराठा जातीत मूळ धरू शकला नाही. कोणतेही तत्वज्ञान बहुसंख्य जनतेत पसरायचें असल्यास मोठ्या जमातीची त्या तत्वज्ञानानें पकड घेतली पाहिजे. त्याचा प्रचार त्या जमातीच्या पुढाऱ्यांनी केल्याखेरीज त्या मोठ्या जमातीचा विश्वास त्या तत्वज्ञानावर व पुढाऱ्यावर सहजासहजी बसत नाही. शेतकरी कामगार पक्ष फार लवकर फोफावला याचें कारण त्याचें पुढारीपण बहुसंख्य असलेल्या मराठा जातीच्या पुढाऱ्याकडे होते. अद्याप जातीवाद आहे. तो गेलेला नाही. पण तो जाण्याकरिता त्याच जातीच्या पुढाऱ्यांनी प्रयत्न केल्यास तो अधिक यशस्वी होतो. कम्युनिझमचा प्रचार ब्राह्मणांनी केल्यापेक्षां तो बहुजनसमाजांतील पुढाऱ्यांनी केल्यास तो अधिक लवकर पसरू शकेल. म्हणून बहुजन समाजांतील मराठा आणि महार जातींतील पुढारीच कम्युनिझम लवकर आणू शकतील. सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांनी जर कम्युनिझमचा प्रचार करायला सुरुवात केली तर जातिविषमता आणि आर्थिक विषमता जायला फार सुलभ होईल. बहुजन समाजांत समतेचें बीज एकदा का रुजले गेलें की मध्यमवर्ग बलवान होत चाललेल्या कामगाराकडे जसा स्वार्थासाठी झुकतो तसाच अल्प जातवाला समाज जातीनिर्मूलन झालेल्या मोठ्या जातींत आपोआप एकरूप होईल. "

(१) 'जीवन प्रवाह' श्री माधवराव खंडेराव बागल - पृष्ठ २२९

## ७ धार्मिक

पूर्वी धर्माच्या नावाखाली लोक कशात,हेने वागत होते याचा मासला बाबा पदमनजी यांनी पुढें दाखविला आहे.

### १ श्रावणमासीं कोटी शिवलिंगें

(१) " बेळगांवीं शंकराचार्य आले म्हणजे ते बहुधा मारुतीच्या देवळांत उतरत. श्रावणमासीं त्यांचें तेथें राहणें झाल्यास कोटी शिवलिंगें करण्याचा धडाका चालायचा. स्मार्त ब्राम्हण हीं लिंगें करण्याचा मक्ता घेत. ते सुपारी एवढाली ल्हान ल्हान लिंगें करून वस्त्रावर लावून ठेवीत. संध्याकाळीं शंकराचार्यांचा कारकून येऊन त्यांचें माप घेई. म्हणजे विटांचें किंवा कवलांचें जसें माप घेतात तसें तीं मोजून त्यास ठरविलेल्या दराप्रमाणें पैसे देई ! ह्या कामांत पुष्कळ पक्षपात व लबाडी होत असे. सर्व लिंगें मोजत नसत. चारी बाजूंच्या रांगेतील लिंगें व सर्व रांगा मोजून त्यांचें क्षेत्रफळ काढीत. लिंग करणारे मधून मधून कमी लिंगांच्या रांगा लावीत. वैष्णव ब्राम्हणास ही लिंगपूजा अगदी आवडत नसे. पार्थिक ( मातीचें लिंग ) करणें व त्याचा विक्रय करणें व तें मोडणें हें महापातक आहे असें म्हणत. बेळगांवीं बहुतकरून संकेश्वरचे शंकराचारी येत. त्यांचा इतमाम फार मोठा असे. त्यास ३० गांवांचें इनाम असून त्यांचें उत्पन्न ३० हजार रुपये आहे. शिवाय लोकांपासून जें मिळतें तें निराळें. ते प्रतिवर्षी दहा हजार

---

(१) ' अरुणोदय ' बाबा पदमनजी - पृष्ठ ३१

ब्राम्हण भोजन घालतात. त्यांची पालखी आडवी चालते व तिच्या बरोबर दिवसा मशाली पेटविलेल्या असतात !

ह्या ' जगद्गुरुस ' कोणी आपल्या घरी बोलाविणे झाल्यास मोठ्या खर्चाचें काम असे. निदान शेदीडशे रुपये तरी खर्च लागावयाचा. साधारण लोक त्यांच्या दर्शनास जाऊन यथाशक्ति काही दक्षिणा त्यास देत. आमच्या घरची माणसे त्यांच्या प्रसादास गेल्याची मला आठवण आहे. तेथल्या पोळ्या बाजरीच्या भाकरी सारख्या रटाळ्या व भटाऱ्याच्या भाकरी एवढाल्या मोठया होत्या. पुरण वाटण्याबद्दल तें पायांनी तुडवीत. स्वयंपाकाच्या चुली ऐवजी मोठाले चर खणून त्याजवर लाकडाच्या फळ्याप्रमाणें लोखंड लोखंडी तवे टाकले होते. ह्या जेवणाची मी घरी आल्यावर चर्चा केली, तेव्हा स्वामीच्या प्रसादास नांव ठेवूं नये असें मला सांगितलें. भोजनसमयीं दर पात्रीं एकएक रुपया आम्ही दक्षिणा दिली. त्या शिवाय आणखीही द्रव्य स्वामीपुढें ठेवले. "

२

माझें पाठांतर, माझी देवपूजा
माझी उपोषणें.

आपल्या धर्मावरील श्रद्धा कमी व्हायला अशाच काही गोष्टी बाबा पदमनजी यांच्या आयुष्यांत लहानपणीं घडल्या त्यांतील एक अशी.

(१) " मुंजीच्या संबंधाने मला जी संध्या वगैरे शिकविली होती, तींत गायत्री मंत्र तर नव्हताच, कारण तो कासार ज्ञातीस जपण्याचा अधिकार नाही असें ब्राम्हण सांगत. तरी मी गोमुखींत हात घालून काही जप करीत असे.

(१) ' अरुणोदय ' बाबा पदमनजी - पृष्ठ ३२.३३

त्याची आता मला आठवण नाही. मुंजीच्या वेळीं मला गुरूने कित्येक गोष्टी शिकविल्या होत्या त्या अशा कीं, कुड्यावर बसू नये, दोन गाढवांच्या मधून जाऊं नये, उभ्याने व सूर्यापुढे लघुशंका करू नये, पाण्यांत पाहू नये. झाडावर चढू नये, रात्री आरशांत पाहू नये. मी व्यंकटेशस्तोत्राचा नित्य पाठ करीत असे. तो केल्याशिवाय जेवीत नसे. तें मला अगदीं मुखपाठ झालें होतें. शिवाय काही पूजापद्धतिही शिकलों होतों. संस्कृत भाषेंत महिम्न नामक शिवस्तोत्र आहे, तेंही मला पाठ येत होतें. परंतु त्याचा अर्थ समजत नव्हता. ह्या शिवाय शिवविष्णु, गणपति यांच्या स्तुतीचे श्लोक, देवीकवच, रामरक्षा, काही आर्या, अभंग, आरत्या इ. पाठ येत होत्या.

मुंज झाल्यावर मला धर्म संबंधी क्रियाकर्में करण्याचे विशेष अधिकार प्राप्त होऊन प्रसंगही मिळू लागले. घरांतील देवपूजा म्हटली म्हणजे दररोज मूर्तीस राख, लिंबू वगैरे चोळून घासून पुसून त्या धुणें, त्यास गंध अक्षता फुलें वगैरे वाहणें, धूप दीप नैवेद्य दाखविणें हें सर्व मी करीत असे. कधीकधी माझे चुलतेही करीत. ही पहिली पूजा झाल्यावर घरचीं दुसरीं माणसें आपापल्या इच्छेप्रमाणें व संकल्पाप्रमाणें कमी जास्त वेळ देवघरांत बसून पूजा, जप वगैरे करीत. परंतु त्याच दिवशी मूर्तीस पुनः स्नान घालीत नसत.

आमच्या घरांत शक्ति उपासना चालत असें हें मागे सांगण्यात आलेंच आहे. त्या शिवाय माझ्या आजोबाने श्रावण मासांतील सोमवारीं व बारा मासांतील प्रदोष, शिवरात्र इ. पर्वकालीं शिवालयांत शिवपूजा मोठ्या थाटाने करावी, ती मी सांग्रंत पहात बसावें. मुलास अशी पूजा करू देत नसत. मंत्र पुष्पांजलीच्या वेळी मात्र त्यांच्या हातून शिवावर फुलें, बिल्वपत्र वगैरे टाकवीत.

मुंज झाल्यावर व्रतें व उपवास करूं लागलों. संकष्टी, विनायकी बारा मासांतील एकादशा ह्या सर्व मी करीत असे. माझ्या मातोश्रीने शिवरात्रीस शिवालयांत लक्षवाती तुपांत लावाव्या, त्या सर्व जळतपर्यंत मी तिच्याबरोबर बसावें.

आमच्या घरीं कांहींना कांहीं व्रताच्या व पूजेच्या निमित्ताने बाराही मास ब्राम्हण यायचेच. त्यांची पूजा, दानें, दक्षिणा ह्या सर्व माझ्या ध्यानांत येत असत. ब्राम्हणाची पूजा केल्यावर त्याचें पादांगुष्ठतीर्थ (पायाच्या अंगठ्याचें पाणी) आम्हां सर्वांस प्राशन करण्यास देत. ब्राम्हणाचा आशीर्वाद म्हणजे फार मोठ्या मोलाचा वाटत असे. तो घेतेवेळी घरांतील मुख्याने पदर पसरून त्याजपुढे बसावे, त्यांत ब्राम्हण आशीर्वादाच्या अक्षता घाली, व आम्हां सर्वांच्या मस्तकावरही टाकी. एक ब्राम्हण दर शनिवारी मारुतीची पूजा करावयास ठेविला होता. तो आमच्या करिता एकादशण्या, महारुद्र वगैरे करीत असे. हा क-हाडा होता. तो जेव्हा आम्हास कांहीं नैवेद्य वगैरे आणी, तेव्हा आम्हीं (त्याला न कळू देता) तो फार तपासून घ्यावा. म्हणजे त्यांत विष घातलें असेल अशा भयाने मीठ वगैरे कांहीं परीक्षा पाहण्याचे पदार्थ टाकून पाहावें, अथवा कुत्र्यामांजरास त्यांतून कांहीं घालावें ! ह्या पूजेबद्दल त्या ब्राम्हणाची आमच्यावर बरीच बाकी चढावी व ती चुकवितांना त्यापाशी आम्हास सूट मागून घेणें पडत असे. तथापि ब्राम्हणाशिवाय कोणतेंही धर्मकृत्य आमच्या एथे चालत नसे."

** ** **

३

## भूत बाधा आणि पंचाक्षरी

त्यावेळी समाजाला भूत बाधेने कसें पछाडलें होतें तें पहा ....

(१) " उपाध्याशिवाय जोशाचेंही आमच्या घरीं येणें जाणें होतें. त्याने एकादशी, अमावस्या इ. तिथीस येऊन आम्हास पंचांग सांगावे, ग्रहांचीं दानें सांगावी. आमच्या घरीं लेकरूं जन्मलें म्हणजे त्याचें यादवान लिहावें. काही शुभकार्य असलें तर तें करण्याविषयी मुहूर्त सांगावें. जोशाच्या बोलण्यावर माझा पूर्ण विश्वास बसला होता. शनीचें व साडेसातीचें मला फार भय वाटे. माझ्या आईने मजवरून वारंवार तेल उतरून मांगणीस द्यावें. मी स्वतः पंचांग पाहण्यास शिकलों होतों. कोणाचीही रास किंवा जन्मनाम विचारून त्याच्या ग्रहांचें बलाबल मला सांगता येत असे. एका ज्योतिषाने मला पंचांग करण्याचें काही श्लोकही शिकविले होते. परंतु ते शेवटास गेले नाही.

जोशीबुवाशिवाय पंचाक्षरी व मंत्री यांचीही आम्हास गरज लागत असे. मुलें माणसे आजारी पडली, संसाराच्या किंवा चाकरीच्या संबंधाने काही अरिष्ट आलें म्हणजे भगतांस व ~~पंचाक्षरीस~~ पंचाक्ष-यास बोलावणें होत असे. हे लोक बहुधा कोकणी असत. त्यांच्या अंगात कोण्या देवाचीं वारीं येत. त्यांनीं सांगावें कीं तुमचें मूल झपेटलें आहे. अमक्या भूतांचा अमक्या ठिकाणी भक देणें राहिलें आहे. अथवा तुमच्या हपिसांतील अमक्याने तुम्हाला करणी केली आहे. तर तुम्ही उलट करणी करा. मग त्यांच्या सांगण्याप्रमाणें बळी व उतारे व ~~अंगारे~~ अंगारे यांची एकच गर्दी उडत

---

(१) अरुणोदय बाबा पदमनजी पृष्ठ- ३४.३५

असे. एकदा आमच्या दारापुढे रात्रीस कोणी काही लिंबे, सुया, उडीद, गुलाल वगैरे आणून ठेविला. तेव्हा घरातील माणसे फारच घाबरली.

आमच्या घराच्या मागल्या खोल्यात ब्रम्हदेव या नावाचे दोन तीन वाटोळे दगड मांडलेले असत. [ हे दगड बेळगावात पुष्कळांच्या घरी आहेत. ] त्यास महिन्यातून एकदा नारळ फोडावा लागत असे. या शिवाय दर अमावस्येस माझ्या चुलत्याने आसपासच्या भूतास शेरणी द्यावी, म्हणजे लाह्या, खारीक, खोबरे, बतासे यांचे तुकडे एकत्र करून परसात फेकावे.

ही खटली बहुत दिवस चालत. तेणे करून द्रव्यक्षय होई इतकेच नाही तर ज्यांची नांवे हे भगत घेत त्यांच्यावर संशय येऊन व्देष, वैर व भांडणे वाढत. कधीकधी हेच भगत आमच्या विरुध्द पक्षास मिळून व चहाडया सांगून आगीवर तेल ओतून भांडणे चेतवीत. हा प्रकार बाहेरच्या लोका विषयीच चालत असे असें नाही, तर घरातल्या घरात देखील हा भगतांनी भांडण लावून द्यावें व तें कधीकधी फार माजावें."

४ अंगात वारे येण्याची रीत

धर्मभोळेपणामुळे समाजाची कशी हानि होत होती तें पाहा ....

( १ )" एकदा माझ्या मायआजीच्या घरची एकबाई मुंबईहून आमच्या घरी बरेच दिवस येऊन राहिली होती. तिच्या अंगात साठ वारे येत. त्या सर्वांची नांवे मला आता आठवत नाहीत. परंतु कित्येकांची येणे प्रमाणे होती. पद्मावती, मोकासनि, बापदेव, चेडया इ. हा वाऱ्यास बकऱ्याची सागुती, कोंबडे

( १ ) ' अरुणोदय ' बाबा पदमनजी पृष्ट - ३६ ते ३८

दारू, अंडी वगैरे लागत. ह्या बाईला आम्ही वारंवार 'देवाशीं बसवावें,' [म्हणजे तिला अंगांत वारें आणावयास सांगावें] व अडलेल्या गोष्टींची विचारपूस करावी. ती अशी कीं बाप गांवीं गेले आहेत ते केव्हा येतील, अमुक मनुष्य आमचा वैरी आहे त्याला काय करावें, म्हणजे त्याचा नाश कसा करावा ? अमुक जिन्नस हरवली ती कोणी नेली? गांवीं गेलेल्या मनुष्याचें पत्र कां येत नाहीं ? अशा प्रश्नास जीं उत्तरें मिळत तीं सर्व खरीं असत असें नाहीं. कधीं कधी बोलाफुलास गाठ पडे, व कधीकधी कांहीच अनुभव येत नसे. तरी त्या सर्व वार्तांवर आमचा पूर्ण विश्वास असून त्यांजविषयीं आमचें मनांत मोठी पूज्य बुध्दि होती.

ह्या बाईच्या अंगांत हीं वारीं येण्याचा प्रकार फार सोपा होता. तिने आपले केश मोकळे सोडून उकड बसावे, [ती सकेशा विधवा होती.] व हात जोडून ते कपाळाशीं धरावे. तिचे डोळे झाकलेले व श्वासोच्छ्वास कांहीं वेळ स्तब्ध झालेला दिसे. अशा अवस्थेंत क्षणभर राहिल्यास तिचें अंग मागें पुढे डुलूं लागावें व श्वास प्रथम घोगरा नंतर मोकळा होऊन तिने आसन बदलून खुरमांडी घालून बसावें. हात मात्र गुडघ्यावर टेकलेले व त्यांचीं अंगठ्या जवळचीं दोन बोटें लांबविलेलीं व बाकीचीं मुठींत वळून घेतलेलीं असत. वारें फार बोलत नसे. आम्हीं विचारलेल्या प्रश्नास मात्र उत्तरें देऊन बाकीचा वेळ घुमत राही. अंगांत वारें येण्याच्या पूर्वी त्याच्यापुढे ऊद किंवा कापुर जाळावा लागत असे. तें आल्यावर त्याने स्वतःही बराच कापुर जाळावा. एका प्याल्यांत पाणी घालून त्यावर कापुर पेटवून तरंगत ठेवावा व त्या कापराच्या बाजुबाजूने पाण्यांत चिमूटभर तांदूळ किंवा राख हळूहळू सोडावी आणि तरंगत राहिलेल्या तांदळाच्या व राखेच्या चित्रविचित्र

आकृतीकडे पाहून आमच्या प्रश्नांची उत्तरें द्यावीं. कधीकधी नागवेलीचें पान कापराच्या वातीवर धरावें, व त्यावर उठलेल्या वेड्या वाकड्या आकृतीवरून उत्तरें द्यावीं. तीं अशीं "अरे, कागद वाटेत आहे " " लेकरू चिंचेच्या झाडाखाली झपेटलें " " कैश्याने देव उठविले आहेत " " अमका देव रुसला आहे. " वारें जातेवेळीं तें भूमीवर अंग टाकून जात असे. जर दुसरे वारें यायचें नसलें तर त्याच्या अंगावर आम्ही पाणी शिंपडावे, म्हणजे अंग झटकून झाड मोकळें होई, पण येणार असलें तर पूर्वी प्रमाणें आसनावर बसून येई. कित्येक वारीं येतांना जमिनीवर लोळत, कित्येक उठून नाचत; कित्येकास हातांत नाचतेवेळीं तरवार किंवा छडी द्यावी लागत असे. देवीचीं वारीं आलीं म्हणजे त्या विधवा बाईने कपाळास मळवट भरावा, व डोक्यांत फुलें घालावीं आणि वारें गेल्यावर तीं काढून टाकावीं व मळवट पुसून काढावा.

अंगांत वारीं येण्याचा व खेळण्याचा हा साधारण प्रकार सांगितला. प्रत्येक पर्वणीच्या काळीं व विशेष प्रसंगीं त्यांच्यासाठीं मोठी तयारी करावी लागत असे. त्यांत कोंबडी, बकरीं, अंडीं, दारू, मेवामिठाई, पक्वान्नें, पुष्कळ फुलें व सुवासिक द्रव्यें आणावीं लागत. ह्या प्रकाराला मांड किंवा मंडळ भरणें म्हणत. तेव्हा पुष्कळ वारीं एकामागून एक अशीं येऊन खाऊन पिऊन खेळून आम्हास प्रसाद म्हणजे त्यांच्यापुढे ठेवलेल्या नैवेद्यांतून काही पदार्थ देऊन जात. ह्या खेळांत संबळ, सनई, ताशे, ढोल वगैरे वाद्यें वाजवावीं लागत."

## ५ सिद्धी प्राप्त होण्याकरिता साधनें

त्या वेळीं लोकांचा मंत्रतंत्रावर विशेष भर होता असें दिसून येतें. त्याचे पुढील प्रकार पाहा ...

(१) " वर सांगितलेली धर्मकृत्यें व धर्माचरणें करीत असताही माझी तृप्ति झाली नाही, तर आणखीही काही साधनें करण्याची मला इच्छा उत्पन्न झाली. काही अमानुष सामर्थ्य प्राप्त करून घ्यावें हा हेतूने कोणापासून मी मंत्र लिहून घेतले, त्यात अन्नाची वृध्दि करण्याचे कित्येक मंत्र होते. ह्याचा अर्थ असा आहे की हे मंत्र अमुक लक्ष जपल्याने थोडक्या स्वयंपाकांत पुष्कळ मनुष्यास भोजन घालता येते, अथवा घरांत थोडकें अन्न असता तें पुष्कळ दिवस चालतें. दुसरेही कित्येक सिध्दीचे मंत्र मी जपत असे. हे मंत्र घरांतील सर्व मनुष्यें निजल्यावर खोलीतच स्नान करून जपास बसावें. अन्नवृध्दीचे मंत्र जपतांना पुढे अन्नपूर्णेची मूर्ति मांडलेली असे. हें माझ्या आईला मात्र ठाऊक होतें. कित्येक मंत्र चंद्रसूर्यांच्या ग्रहणसमयीं जपण्याचे होते. परंतु त्या पासून काही लाभ झाला नाही. तरी ते खोटे आहेत असें मला वाटलें नाही. जपांत काही चूक झाली असावी असें वाटे कारण त्यांची संख्या लक्षावधी असून त्या संबंधी कित्येक कडक नेमही पाळले पाहिजेत, असें ते मंत्र लिहून देणाराने सांगितलें होतें. एक नेम असा होता की मंत्र जपतांना रजस्वला स्त्रीचा शब्द कानीं पडू नये.

हे मंत्र माझ्या चुलत्याच्या कागदपत्रांत शोधि करून पाहता सापडले. ते माझ्या हातचे असून अक्षराच्या वळणावरून ते सुमारे १८४६ सांत म्हणजे मी सुमारे १५.१६ वर्षांचा असतांना लिहिलेले आहेत. असें अनुमान होतें.

(१) मंत्र अन्नपूर्णेचा

ॐ अन्नपूर्णा अन्न पुरे, घृत पुरे महेश जलदेवता ब्रम्ह पुरे रक्षाकरे गुरुदेव महेश एक लक्ष जप.

---

(१) 'अरुणोदय' बाबा पदमनजी - पृष्ट २९.४०

(२) ॐ फाटी पोहोप भय प्रकाश बीजरली आया हात पाँच लडडू शेर शेंदूर रिध्दिसिध्दि लेआ व माता गंगा. संपूर्ण भरपूर. नमो लक्ष्मी नारायणा. जप १२५०००.

(३) ॐहरि यंग हरियंग धं करण महावीरा सर्व व्याधी विनाशक वीर व फुटक भयंनास्ती खोरका महाबळा जत्र तिष्ठतिसार देवलीस्त असुर पुस्तक भय रोग अस्तंत्र प्रणीसती बात पित्त कपोतमियत तर राजभय नास्ती ।। उती करण जपा करे स्तखिनी भूत वेताल राक्षसी प्रीवकि नानाकाले मरणश्चैव व सर्पांचा दर्शतिचा अग्निचोरोभिय नास्ति घंटा करण नमोस्तुते ।। इति श्री हनुमान बीज मंत्र राजकेतन पंथके घोर मेचोरके बंधमे जिसके बीचमे श्री हनुमान देव त्राण कीर श्री हनुमान तारे बीद मही अंजनीसुताय धी मही. तन्नोहनुमान प्रचोदयात. हनुमान जप संपूर्ण ।।

| ६ | ताईत मोडून टक्के केले. |
|---|---|

(१) " आमच्या कुटुंबास औषध देणारा एक रमण शेठी नावाचा कोमटी जातीचा म्हातारा वैद्य होता, तो रोग्यास औषधि उपचार करीत असून मंत्रोपचारही करीत असे. ह्याजपासून माझ्या वडिलांनी एकदा घरातील सर्व मुला करिता ताईत करून घेतले होते. ते पुतळीच्या सोन्याचे पत्र्यावर काही मंत्र ( अक्षरे ) लिहून केले होते. ह्या पत्र्याची वळकटी करून चांदीच्या भूषणांत बंद करून आमच्या गळ्यांत किंवा बाहूला बांधली असे. एकदा पैशाची फार गरज लागली तेव्हा माझ्या वडिलांनी हे सर्व ताईत मोडून त्यांचे टक्के केले ! "

(१) । अरुणोदय । बाबा पदमनजी - पृष्ठ ४०

## ७ अनेक प्रकारचे मांत्रिक उपाय

(१) " आमच्या घरचीं मनुष्यें हिंदुधर्मातील दैवताशिवाय मुसलमानांच्या पीरांची भक्ति करीत असत. बेळगांवांत असदखान नावाच्या पीराचा प्रसिद्ध दर्गा आहे. त्यास माझे चुलते दर आठवड्यास एकदा नेमाने जात असत. तेव्हा मुलासही बरोबर नेत. पीराला साखर, सब्जा, फुलें, खिचडी, मलिदा असे पदार्थ द्यावे. तेथल्या फकिरास खैरात द्यावी, साखर वाटावी व सर्व मलिदा पीरापुढे ठेवून प्रसाद म्हणून काही साखर मात्र परत आणावी. ह्या पीरास व दुसऱ्या पीरास आमच्या घरांतील मनुष्यें नवस करीत. माझ्या भावाचे देवीने डोळे गेले होतें. ते बरे होण्याकरिता बेळगावाजवळ मुगुटखान हुबळी नावाच्या एका खेड्यांत एक नवीन पीर उत्पन्न झाला होता, त्याकडे दर आठवड्यास त्यास घेऊन जात. परंतु त्यापासून काही झालें नाही. श्रम व पैसे मात्र फुकट गेले. ह्या भावाच्या डोळ्याकरिता अशा प्रकारचे मांत्रिक उपाय पुष्कळ केले व त्यात सुमारें ५०० रु. खर्चही आला. परंतु तो सर्व व्यर्थ गेला. तसेच घरांत कोणी रोगी पडले अथवा कोणास भूतबाधा झाली असें वाटलें तर एखाद्या नामांकित सैयद किंवा फकिरापासून कागदावर काही मंत्र लिहून आणून त्याची वळकटी गळ्यांत बांधीत किंवा तो कागद पाण्यांत बुचकळून तें पाणी प्यायास देत.

माझ्या चुलत्याच्या कागदपत्रांत पुष्कळ यंत्रें लिहिलेलीं सापडली. त्यापैकीं कित्येकांचे उपयोग मात्र येथे सांगतो. " डोळ्याची व्यथा दूर होण्याचें यंत्र "

---

(१) 'अरुणोदय' बाबा पदमनजी - पृष्ठ ४२

" हें यंत्र बांधणें चिंता जाईल " " हें यंत्र ताईत घालून गळ्यांत बांधिजे, सर्व जन वश्य होईल." " हें यंत्र तुळशी पत्रावर लिहून रोज मुलास खाण्यास देणें विद्या लवकर येईल."

हीं यंत्रें कांही अक्षरांचीं व कांही अंकांची आहेत. तीं येणे प्रमाणें ..

| | | |
|---|---|---|
| ह्रीं | ह्रीं | द्रीं |
| ग | जीं | ग |

| | | |
|---|---|---|
| ३ | ११ | ६ |
| ९ | ७ | ४ |
| ८ | २ | १० |

कांही यंत्रें वाघ वगैरे जनावरांच्या आकृतीची असून त्यांत अक्षरें व शब्द लिहिलेले आहेत. दुसरीं कित्येक यंत्रें जारण मारण, वशीकरण संबंधी आहेत. "

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | मारुतीस | किती | लावणें |

(१)" आईला कांही संकट पडलें म्हणजे तिने मारुतीस किती लावाया रात्रीचें जावें, तेव्हा तिच्या बरोबर मीही जात असे. पुजाऱ्याने मारुतीच्या अंगाला सुपाऱ्या किंवा नागवेलीच्या पानांचे तुकडे चिकटवावे, कधी कधी तांदूळही लावावे. नंतर डावी किंवा उजवी दे असें मागून त्यांतून कांही सुपाऱ्या वगैरे पडत तोंपर्यंत गाऱ्हाणें घालीत व वाट पहात बसावें. ह्याबद्दल पुजाऱ्यास दर खेपेस एक दोन रुपये द्यावे लागत.

---

(१) 'अरुणोदय' बाबा पदमनजी - पृष्ठ ४३

९ — धनगरी देवास विचारायास जाणे

या शिवाय आणखी एका देवाबद्दल बाबा पदमनजी पृष्ट ४३ वर म्हणतात ...

" बेळगांवांत कोणी एक धनगर होता. त्याच्या घरीं काही दैवत असे. त्यापाशीही आमच्या घरचीं मनुष्यें विचारपूस करायास जात. मीही एकदा आपल्या चुलत्याबरोबर रात्रीं गेलों होतों. वाटेंत आमच्यापुढे एक ऊंच मराठा शिपाई हातांत छडी घेऊन चालला होता. धनगराचे घर गांवाबाहेर असून बरेंच दूर होतें. त्यावेळी चांदणें टिपूर पडलें होतें. अंगणांत पुष्कळ मेंढरें बसलीं होतीं. त्यांच्या मधून आम्ही झोपडींत शिरलों. तेथें एक पितळेचा मुखवटा होता. त्यापुढे धनगर बसलेला होता. त्याच्या हातांत एक वेतकाठी होती. त्यानें आमचें बोलणें ऐकून घेतल्यावर धूप जाळून त्याच्या धुरावर ती काठी आडवी धरली व ती वाटोळी फिरवीत व तिच्याकडे पहात असता आमच्या प्रश्नास उत्तरें दिलीं. त्याच्या अंगांत वारें आलें होतें किंवा नाही हें मला समजलें नाही. "

१० — " असें आम्हास अगदी वाटत नाही.

धार्मिक आचारविचारावर दादोबा पांडुरंग यांची श्रध्दा नव्हती असें दिसतें. म्हणून ते म्हणतात .....

(१) " जाबव-यास नोकरी निमित्त जात असता नाशकास आमच्या उपाध्यायांचा व इतर ब्राम्हणांचा फार आग्रह पडला. परंतु मी त्यास साफ

(१) दादोबा पांडुरंग   दादोबा पांडुरंग - पृष्ट ९२

सांगितलें " गंगाबाईत स्नान केलें म्हणजे आमचे पाप जाईल किंवा येथे श्राध्दविधी केला असता आमच्या पूर्वजांचा उध्दार होईल असें आम्हास अगदी वाटत नाही, व तशी आमची श्रध्दाही नाही. म्हणून त्या खटपटींत तुम्ही मला घालूं नका. वरकड आमच्या शक्ती प्रमाणें आम्ही तुम्हास दक्षिणा वगैरे देऊं." ब्राम्हणास आणखी काय पाहिजे? त्यास आमची किंवा आमच्या वडिलांच्या उध्दाराची थोडीच काळजी असते ! "

** ** **

८

# शैक्षणिक

सध्या मुलांना शारीरिक शिक्षा जवळ जवळ होतच नाही. परंतु पूर्वी मात्र विद्यार्थ्यांना झोडपून काढीत असत. बाबा पदमनजींचा पुढील उतारा पाहा.....

(१) शिक्षणपध्दति आणि शिक्षेचे प्रकार

" ह्या शाळेत शिकविण्याची रीत येणे प्रमाणें होती. मुलास धडे त्यार करण्याकरिता शाळेंत वेळ देत असत. आता जसें एकसारखे धडे देतच राहतात तसें नव्हतें. मुलांच्या कापी लिहिण्याकडे फार लक्ष देत. प्रत्येक वर्गाचा मास्तर आपापल्या मुलांस किता (कापी) घालून देई. वरच्या वर्गांतील मुलें दर बुधवारी काही तरी विषयावर इंग्रजींत स्वल्प निबंध लिहून आणून पत्राप्रमाणें त्याचा लखोटा करून व त्याजवर केनन साहेबांचें नांव लिहून त्यांच्या मेजावर ठेवीत. नंतर साहेब एकएका मुलास बोलावून त्याचें पत्र वाचून त्यांत ज्या चुक्या असतील त्या शुध्द करीत. ते वाचतेवेळीं मुलगा त्यांच्या मागे खुर्चीजवळ उभा राही. विद्यार्थ्यांस ईंग्लिश भाषेंत मजकूर लिहिण्यास व विचार वाढविण्यास शिकविण्याची ही फार उत्तम पध्दति होती.

ह्या शाळेंत मराठी शाळेप्रमाणें मुलास शिक्षा करण्याचे क्रूर प्रकार नव्हते. तरी मास्तरलोक मुलांस बरीच कडक शिक्षा करीत. त्या प्रत्येकाच्या हातांत छडी असायचीच. शाळेच्या आसपास अडुळशाचीं झाडें होतीं, त्याच्या फांद्या मोडून

---

(१) 'अरुणोदय' बाबा पदमनजी - पृष्ट १९

मुलें त्यास छडी आणून देत व ती त्यांच्याच अंगावर व हातावर जोराने पडत असे. ' छडी लागे छमछम किंवा येई घमघम ' ह्या म्हणीचा वारंवार आम्हास अनुभव येत असे. मुलांचे कान पिळायाची व गालांवर चपडाका मारण्याचीही चाल होती. त्यास बाकावर उभे करीत; चोरी वगैरेच्या अपराधास किंवा फार दिवस धडा न केल्याच्या अपराधास ' डन्स क्याप ' नावाची कागदाची टोपी करून मुलाच्या डोक्यांत घालून त्याला शाळेत फिरवीत. शाळेत मुलांचें बुक, स्लेट, चाकू वगैरे जिन्नस हरवली असता संध्याकाळीं शाळा सुटतेवेळी दाराशी प्रत्येक मुलाचा झाडा घेत. धडा न शिकणाऱ्या मुलास सुटी झाल्यावर तासभर कोंडून ठेवीत. शाळा सुटण्याचे वेळी पाद्रीसाहेब प्रार्थना करीत. प्रार्थना झाल्यावर मास्तर मुलांची कापी पहात. ज्याने कापी लिहिली नसेल त्याला व वाईट अक्षर लिहिणारास शिक्षा होत असे. "

## २    मुलांच्या इन्साफाचें कोर्ट.

मुलांनी केलेल्या अपराधाबद्दल मुलेंच निवाडा देत असाही प्रकार घडत होता ...

(१) " त्या दिवसात मि. नारायण शेषाद्री हे ब्राम्हणी पोषाक करीत असत. त्यांचीं सर्व वस्त्रें फार शुभ्र व स्वच्छ असत. पांढरें पागोटें, पांढरा अंगरखा, पांढरें उपरणें, पांढरें धोतर, पायांत परभुशाई जाधवी जोडा, व लांब पांढरें इस्टाकीन असा त्यांचा पोषाक होता. त्यात दोन गोष्टी मला विलक्षण दिसल्या. त्या म्हणजे त्यांच्या डोक्याचे इंग्लिश चालीप्रमाणें राखलेले केश व पायांतील

---

(१) ' अरुणोदय '    बाबा पदमनजी - पृष्ठ ६४

इस्टाकिन. त्यांचें इंग्रजी बोलणें शुद्ध स्पष्ट परंतु अमळ मंद होतें. ते मुलांशी क्वचित मराठींत बोलत. ते फार श्रमाने व आस्थेने शिकवीत. त्यांच्या वर्गांतील मुलेंही हुशार व आनंदी असून त्यांचा मान राखीत. कोणीकोणी त्यांजवर प्रीति करीत. ते कित्येक गरीब मुलास आपल्या खर्चाने शिकण्याचीं बुकें देत, इतकेंच नाही तर कपडेही देत. हे त्यांचे गुण व बोज पाहून माझ्या मनाला जो त्यांविषयीं कंटाळा आला होता तो लवकरच नाहींसा झाला. तरी जेव्हा ते हिंदुधर्मांविषयी बोलत तेव्हा मला बरें वाटत नसे. कधी कधी मी त्यांच्याशी वाद घाली, परंतु ते लवकरच मला कुंठित करीत.

नारायण साहेबांनी मुलांच्या अपराधांची चौकशी करण्याकरिता एक कोर्ट स्थापिलें होतें. शाळा सुटल्यावर सर्व अपराधी मुलास त्या कोर्टापुढे आणीत. त्या कोर्टांत ज्युरर होते, त्यांनी आपला अभिप्राय स्लेटीवर किंवा कागदावर लिहून दाखवावा, अथवा तोंडीच सांगावा. मुलावरील दोषारोपही त्यांचे मास्तर लिहून आणीत. मि. नारायण हे स्वता त्या कोर्टाचे ~~जज्ज~~ जज्ज होते. कोर्टाचा इनसाफ बहुधा सर्वांस मान्य होत असे. असें इनसाफाचें कोर्ट मनिस्कुलांतही त्या वेळीं होतें असें एका जुन्या पुस्तकावरून (ओरिएंटल क्रि. स्पेक्टेटर) समजतें.

## ३ मुलांची परोपकारी मंडळी

गरीब मुलांना सहाय्य करण्यासाठीं मुलांनी एक मंडळी स्थापन केली होती. बाबा पदमनजी पुढे पृष्ट पासष्टवर म्हणतात ...:..

" ह्याच गृहस्थांच्या प्रयत्नाने तेथे एक मुलांची परोपकारी मंडळी स्थापिली होती.

तिच्या योगाने गरीब मुलास पुष्कळ सहाय्य होत असे. ह्या मंडळीची व्यवस्था व उन्नती करण्यात हेनरी बेल व जानी बेल ह्या नावाचे दोघे बंधु फार श्रम घेत. ह्यापैकी एक जण स्काटलंदास जाऊन विशेष विद्याभ्यास करून पाळकाची दीक्षा पावून तेथेच राहिला. रेव. हेनरी बेल यांचे वडील व माझे वडील हे उभयता एकाच इंजनेरिंग स्कूलात शिकलेले होते. मि. डब्ल्यु.एच.बेल हे इंग्लीश वर्गात होते व माझे वडील मराठीत होते. हे वृद्ध गृहस्थ काही काळ रेव. निसबिट साहेबांच्या बंगल्यात राहिले होते. तेव्हा त्यांनी त्यांच्या खासगत वर्गास आमच्याबरोबर येऊन बसावें अशी ह्यास ज्ञानप्राप्ती करून घेण्याची इच्छा होती. तरुण वाचकांनी ही गोष्ट लक्षात ठेवावी."

४

## "देवा दिले क;"

पूर्वी लहान मुलांना क का कि की कसें शिकवीत होते त्याचा दादोबा पांडुरंगांनी सांगितलेला नमूना पहा .....

(१) " तेथे लिंगू नावाचा पंतोजी होता. तो शिकवावयाचा "क काना दिले का, ऱ्हस्व्यान कि, दीर्घ्यान की, ऱ्हस्व्यान कु, दीर्घ्यान कू, एक मात्रा के, दुमात्रा कै, कानामात्रा को, दुमात्रा काना कौ, माथा दिले कं, देवा दिले क; "

५

## स्त्री शिक्षणाचा देशकल्याणाशी संबंध

स्त्री शिक्षणाशिवाय देशोद्धार होणार नाही असा विचार फार पूर्वीही आपल्या लोकांच्या मनात येत होता असें दिसतें, म्हणूनच दादोबा म्हणतात..

(१) 'दादोबा पांडुरंग' दादोबा पांडुरंग - पृष्ठ १५

(१) " लहान मुलास चांगल्या शिक्षेस लावणें ही काही लहान गोष्ट नाही. मोठ्या विद्वत्तेची गोष्ट आहे. लहान मुलांचें सुख दुःख पाहणें, आणि त्यास आनंदात ठेवणें, ह्यांत मोठा सूक्ष्म विचार आहे. या विषयी पुष्कळ लोक अनास्था करितात. म्हणूनच पुढे प्रजा वाईट होत्ये. लहान मुलांच्या जे जे सद्गुणाचे अथवा दुर्गुणाचे अंकुर उगवतात ते विचाराच्या सूक्ष्म दृष्टीने पाहणें आणि त्यास उत्तेजन देणें, अथवा त्याचा हिरमोड करणें हें मोठें चातुर्याचें काम आहे. म्हणून असें चातुर्य आईच्या ठिकाणीं पाहिजे. याजकरिता आया सुशिक्षित पाहिजेत, तरच प्रजा चांगली होते. तेव्हां स्त्रीशिक्षणाचा देश कल्याणाशी किती निकट आणि अपरिहार्य संबंध आहे तो पाहा."

६ — हें काम फार हलकें वाटत असें

त्या काळी ब्राम्हणेतरांना शिकविणें हें ब्राम्हणांना कमीपणाचें वाटत असें. आता मात्र तसें वाटत नाही. त्या वेळच्या परिस्थितीबद्दल दादोबा सांगतात ....

(१) " सन १८२७ त मी वरच्या वर्गात गेलों. त्या वेळेस वरच्या दोन तीन वर्गास वाचन लेखन आणि व्याकरण शिकविण्याकरिता बापुशास्त्री मायदेव शुक्ल यांची नेमणूक झाली. हे शास्त्री संस्कृत व्याकरणांत मोठे प्रविण होते. हे नवीनच मला वाटतें गुरु जवळून अध्ययन करून, पुण्यात व इतर ठिकाणी शास्त्र्यांच्या सभा पाहून आले होते. त्यास हे परभु, शेणवी, सोनार, वैश्य अशा जातीच्या मुलास मराठी व्याकरण शिकविण्याचें काम फार हलकें वाटत होतें. जर पेशवाई असती तर ते असें काम शंभर रुपये दरमहा घेऊन टिकले ना, मग चाळीस रुपयास कोठून ? परंतु आपल्या विद्वत्तेचे भोक्ते कोणी राहिले नाहीत म्हणून उदरनिर्वाहाकरिता त्यास रोजगार पाहणें जरूर पडलें.

---

(१) 'दादोबा पांडुरंग' दादोबा पांडुरंग - पृष्ट ३५, ३६

## ७ अद्यापि ही ग्रंथी सुटत नाही

पूर्वी खालच्या जातीच्या लोकांनी शिकू नये असें वरच्या जातीचे लोक कां म्हणत होते तें पाहा ... पुढे पृष्ठ ४९ वर दादोबा लिहितात.

" धाकजी दादाजी हे त्या वेळेस ख्यातींत व मोठे प्रतिष्ठित गृहस्थ होते. त्याचें म्हणणें असें पडलें की जर हे हलक्या जातीचे लोक शिकून पुढे हुशार झाले तर उंच जातीच्या लोकांत इंग्रेजींत रोजगार मिळणार नाही. व त्यांची आपली बरोबरी होत राहील. हें त्याचें म्हणणें त्या काळच्या बहुतेक लोकांस मोठें शहाणपणाचें व दूरंदेशीचें असें वाटलें व त्यांची हिंदु लोकांत बरीच वाहवा झाली. त्यांत त्यांच्या जातींत तर फारच झाली. त्यांच्या त्या काळच्या आखुड समजुतीप्रमाणें ह्यांना मोठा दोष द्यावा असें मला वाटत नाही. अद्यापी आता इतके शिक्षितलोक आहेत व सुधारलेपणाचा मोठा अभिमान बाळगतात, त्यांच्याही मनांतून अद्यापी ही ग्रंथी सुटत नाही. किंबहुना तेव्हांपेक्षा आता जातिव्देष आंतून अधिक वाढल्यासारखा दिसतो. मग वृद्ध धाकजीकडेस या नियमाचा मोठा दोष लावावा हें मला प्रशस्त दिसत नाही."

## ८ तर त्या आज्ञेंत रहावयाच्या नाहीत

स्त्रियांना शिक्षण दिलें तर त्या बिघडतील अशी काही लोकांची समजूत होती असें दिसतें. पुढील उतारा पाहा ......

(१) " दुपारी मिस हरफर्डबाई शिकवून गेल्यावर आता अंग धुवू की काय करूं असा विचार करीत दहापांच मिनिटें मी तशीच बसलें. इतक्यात

(१) " आमच्या आयुष्यांतील आठवणी "- रमाबाई रानडे - पृष्ठ ७९.

वन्सकडून निरोप आला की " तिला म्हणावें आडावर जाऊन अंगबिंग धुवून आमच्या भोवती आणखी दुखणी आणू नको. आमची आम्हाला कामें पुरेशी आहेत. त्यात तुमची दुखणी काढण्याला वेळ नाही. हव्या तशा नाचा. जें एकएक होईल तें थोडें आहे.

त्या दिवशी हिरा बागेंत मौजा पाहण्याला आलेली आमच्या घरची आश्रित नि विद्यार्थी मंडळी परत आल्यावर आमच्या घरातील वडील बायकांना " वहिनीबाईनी हजार दोन हजार माणसांत इंग्रजींत वाचलें; लाजल्या नाहीत किंवा घाबरल्या नाहीत." वगैरे खूप तिखटमीठ लावून व फुगवून मजकूर सांगितला. पण हा दोन अर्थानी होता. ह्या बद्दल जसजसे आमच्या वडील बायकाकडून त्यांना प्रोत्साहन मिळत जाई तसतसे ते पुन्हा पुन्हा तेंच तें सांगत. आमच्या घरांत बायकांपैकी सगळ्यात वडील काय त्या ताई सासूबाईच होत्या. आमच्या सासूबाई वारल्यावर स्वतःला ताईसासूबाईनी दोन तीन वर्षे पर्यंत सर्वपरीने आईसारखे वागविले, त्यामुळे त्यांना आईच्याच ठिकाणी मानावयाचे असे. त्या कोणाला काही बोलल्या वेळेवर शिव्या दिल्या तरी त्यांना कोणीही उलट उत्तर दिलेलें स्वतःला आवडत नसे. इतकेंच नव्हें तर स्वतःला सुद्धां काही बोलल्या तरी तें सर्व मुकाट्याने ऐकून घ्यावयाचें पण त्यांना उत्तर म्हणून द्यावयाचें नाही असा नियम असे. असें असल्यामुळें राग आला म्हणजे त्या वाटेल त्याला वाटेल तसें बोलत व सर्वजण त्यांना भीत. कोणावर ही गदा केव्हा येईल याचा नियम नसे व त्याला कारणही लागत नसे.

वर सांगितलेली सभेची हकीकत होता होता ताईसाहेबांच्या कानावर गेली. त्या ती हकीकत ऐकत असता वन्स त्यांच्याजवळ येऊन म्हणाल्या" ताई अलीकडे होताहेत या गोष्टी चांगल्या नाहीत बरें! भाऊंच्या वेळचा अभिमान

तुम्हीच राखला पाहिजे. बायको दुसरी व फजीती तिसरी हा अनुभव आमच्याच घरी येऊन पहात आहे. आपल्या माईच नाहीत का ? त्याही दुसऱ्याच होत्या, लाडक्या होत्या; पण परक्या पुरुषाच्या दृष्टीस पडण्याची त्यांची काय ताप होती ? एक दिवस पन्हाळ गडावर अंगणामध्यें कारकून पाणी प्यावयास आले. त्यावेळेस आम्ही आत न जाता तेथेच उभ्या राहिलों, इतकाच अपराध! एवढ्या वरूनच आमच्या भाऊंनी या माईशी चार दिवस भाषण वर्ज केलें होतें. ती कदर कोणीकडे व हल्लीचा प्रकार कोणीकडे ? जें पहावें तें अधिक आहे. "

या प्रमाणें ताईसाहेबांच्या रागात भर घालून वन्स देवघरात गेल्यावर ताई सासूबाईचा भुडिमार सुरु झाला, तो साडेनऊ वाजेपर्यंत चालू होता. त्या दिवशी स्वतःला घरी येण्यास बरीच रात्र झाली. घरी आल्यावर स्वतःच्या समक्ष ताई बाई रागाने बोलत होत्या, पण पहिला आवेश मात्र नव्हता.

त्या म्हणाल्या " दिवसादिवस माणसांनी अब्रू अगदी सोडून दिली. पहिल्या बायका पुरुषांच्यापुढे उभ्यासुद्धा रहात नसत. मग बोलण्याची गोष्ट कशाला ! पुण्याहवाचनाला मात्र चार माणसांत बायकांना नवऱ्याजवळ बसण्याचा प्रसंग येई. तेव्हां मानेला कळ लागली तरी वर मान करावयास त्यांचा धीर होत नसे ! त्या बायका का लाडक्या नसत ? का त्यांच्यामध्ये प्रेम नसे ? आताचें प्रेम म्हणजे बायकोने पदराला पदर बांधून जवळ असावें, खुर्चीला खुर्ची लावून जवळ बसावें, पुरुषासारखे लिहावें व वाचावें येथवर आलें. आतापर्यंत घरांतल्या घरांतच ऐकत होतो. पण आजची त्यावर कडी आहे ! एवढ्या हजार दोन हजार मंडळींत बायकोने इंग्रजी वाचलें त्याची लाज कशी वाटली नाही ! डोक्यावरचे पागोटें तरी राहिलें कसें ? पहिले लोक अब्रूला किती जपत असत, पण ती आता

राहीलीच नाही. उलट मोठें आवडलें असेल! त्याच वेळेस उठून पाठ थोपटायची होती, म्हणजे अधिक चांगलें झालें असतें !

बायकांना शिकविलें म्हणजे त्या उद्दिष्ट होतात, त्यांच्या डोळ्यांत पाणी रहात नाही. ही गोष्ट खोटी आहे काय ? शिकवायाचेंच तर व्यंकटेशस्तोत्र, शिवलीलामृत या सारखे काही वाचता आलें म्हणजे पुष्कळ झालें. पुरुषासारखें इंग्रजी शिकून काय चाकरी करावयाची आहे? कोणतीही गोष्ट मर्यादेच्या बाहेर गेली म्हणजे तिचा परिणाम असाच व्हावयाचा. इंग्रजी शिकविलें म्हणून असें झालें. आता तरी तें इंग्रजी सोडून द्या. आताच्या या मुली बोट दिलें म्हणजे हात गिळावयास येतात. त्यांना बेताने वागविलें नाही तर त्या आळ्यात रहावयाच्या नाहीत. काय बाई तरी! घरांत ती एक शब्द बोलत नाही. रागावलों तर चकार शब्द काढीत नाही. कितीतरी गरीब दिसते. पण बाहेर पहा तिला इतका कुठला धीटपणा आला तो! ऐकिल्यापासून मला पुन्हा पुन्हा नवल वाटते आहे ! "

**९** **मुलींच्या शिक्षणाची त्यावेळची कल्पना**

स्त्रियांच्या शिक्षणाविषयी त्यावेळी किती कोती समजूत होती तें पाहा.

(१) "आमच्या गांवीं त्यावेळी म्हणण्यासारखी मुलांचीच शाळा नव्हती मग मुलींची कोठून असणार ? त्या वेळी मोठ्या घरच्या मंडळींत बायकांनी शिकावें की नाही या विषयी चर्चा देखील होत नसे. स्त्रीशिक्षणाचा प्रश्नच तेव्हा

(१) ' माझी कहाणी ' - पार्वतीबाई आठवले - पृष्ठ १

फारसा उत्पन्न झाला नव्हता. आम्हा लहान मुलींना पूजेची तयारी करता. आली, तांदूळ कांडता येऊ लागलें, लहान मुलांना आंघोळ घालून त्यांची खाण्या पिण्याची व्यवस्था करता येऊ लागली म्हणजे आम्हाला मिळावयाचें तें सर्व शिक्षण मिळालें असा त्या वेळी समज असे. आमची त्या वेळची मॅट्रिक परीक्षा म्हणजे भातपिठलें करता येऊन देनापानांचा स्वयंपाक करता येणें ही असे. मी माझ्या अकराव्या वर्षी या परीक्षेत पास झालें होतें. "

++ ++ ++